रायगड, नवी मुंबई

◆ वर्ष १५ ◆ अंक ३३०
www.ramprahar.com

# राम प्रहर

रविवार, १८ जून २०२३ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २

**अंतरंग**

रायगडातील वन्यप्राण्यांच्या बचावासाठी रुग्णवाहिका/२
रविवारनिमित्त 'रविप्रहर'मध्ये विविध विषयांवरील लेख/४
उरणच्या सिद्धार्थ म्हात्रेची 'एमपीएल'मध्ये निवड/८




# तिलारी प्रकल्पासाठी ३३० कोटी मंजूर

## बैठकीत निर्णय : मुख्यमंत्री शिंदे, उपमुख्यमंत्री फडणवीस, गोव्याचे मुख्यमंत्री सावंत यांची उपस्थिती





**मुंबई : प्रतिनिधी**

महाराष्ट्र व गोवा या दोन्ही राज्यांच्या संयुक्त व महत्त्वाकांक्षी तिलारी आंतरराज्य पाटबंधारे प्रकल्पाच्या कालव्यांच्या पुनरुज्जीवनाकरिता ३३० कोटी रुपयांच्या खर्चास शनिवारी (दि. १७) तिलारी आंतरराज्य धरण प्रकल्पाच्या नियंत्रण मंडळाच्या सहाव्या बैठकीत मान्यता देण्यात आली.

सह्याद्री राज्य अतिथीगृह येथे झालेल्या या बैठकीस मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, गोव्याचे मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत, उपमुख्यमंत्री तथा जलसंपदामंत्री देवेंद्र फडणवीस, गोव्याचे जलसंपदामंत्री सुभाष शिरोडकर यांची प्रमुख उपस्थिती होती.

'आपले विचार एक आहेत. त्यामुळे गोवा आणि महाराष्ट्राच्या हितासाठी आपण एकत्र येऊन खूप काही करू शकतो,' असा विश्वास मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी व्यक्त केला. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, गोवा महाराष्ट्राचा लहान बंधू आहे. त्यामुळे गोव्याच्या आमच्याकडून ज्या अपेक्षा असतील, त्या पूर्ण करण्यासाठी प्रयत्न करू.

गोव्याचे मुख्यमंत्री प्रमोद सावंत म्हणाले, महाराष्ट्र सरकारने वेळोवेळी खूपच चांगले सहकार्य केले आहे. पाणी या विषयाबरोबरच सर्वच क्षेत्रात यापुढेही असेच सहकार्य लाभेल असा विश्वास आहे. तिलारी प्रकल्पासाठी महाराष्ट्र सरकारकडून मिळत असलेल्या सहकार्याबद्दल त्यांनी आभारही मानले. गोव्याचे जलसंपदामंत्री सुभाष शिरोडकर यांनीही पाणीवाटपच नव्हे, तर अन्य विषयातही सहकार्य वाढवू, अशी अपेक्षा व्यक्त केली.

तिलारी प्रकल्पाच्या कालव्यांची कामे ३० ते ३५ वर्षांपूर्वी झाली आहेत. त्यामुळे जीर्ण झालेल्या आणि गळती होणाऱ्या डाव्या व उजव्या कालव्यांच्या पूनरुज्जीवनाबाबत बैठकीत एकमत झाले. त्यासाठी ३३० कोटी रुपयांच्या खर्चास मान्यता देण्यात आली. सिंधुदुर्ग जिल्ह्यातील अतिरिक्त अशा २२ प्रकल्पबाधितांना नुकसानभरपाई देण्याचाही निर्णय घेण्यात आला. या वेळी मुख्यमंत्री सावंत यांनी प्रकल्पाची उंची वाढवण्याचा प्रस्ताव दिला. त्यावर धरणाचा सर्वंकष अभ्यास करून अहवाल सादर करण्याचे निर्देश देण्यात आले. गोव्यातील अभियंताच्या क्षमता बांधणीसाठी महाराष्ट्राकडून सहकार्य करण्याचे मान्य करण्यात आले. तिलारी प्रकल्पाच्या ठिकाणी कालवे पुनरूज्जीवन आणि संनियंत्रणाच्या दृष्टीने संयुक्त कार्यालय स्थापन करण्याचा निर्णयही घेण्यात आला.

या वेळी राज्याचे जलसंपदा विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव दीपक कपूर यांनी प्रकल्पांबाबत विस्तृत सादरीकरण केले. बैठकीस वित्त विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव डॉ. नितीन करीर, महसूल विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव राजगोपाल देवरा, गोव्याच्या जलसंपदा विभागाचे सचिव सुभाष चंद्रा, कृष्णा खोरे विकास महामंडळाचे कार्यकारी संचालक अतुल कपोले, गोव्याच्या जलसंपदा विभागाचे मुख्य अभियंता प्रमोद बदामी, अधिक्षक अभियंता ज्ञानेश्वर सालेकर, कार्यकारी अभियंता मिलिंद गावड यांच्यासह अन्य अधिकारी उपस्थित होते.

### प्रकल्प दृष्टिक्षेपात...

तिलारी आंतरराज्य प्रकल्पासाठी गोवा राज्य ७६.७० टक्के खर्च उचलते. या प्रकल्पाची २१.९३ टीएमसी इतकी क्षमता आहे. यातून गोवा राज्यासाठी १६.१० टीएमसी आणि उर्वरित ५.८३ टीएमसी महाराष्ट्राला पाणी मिळते. प्रकल्पामुळे गोवा राज्यातील २१ हजार १९७ हेक्टर जमीन सिंचनाखाली येते, तर महाराष्ट्रातील सहा हजार ७७६ हेक्टरला सिंचन लाभ होतो. या प्रकल्पातून मुख्यत्वे गोवा राज्यातील उत्तर गोवा जिल्ह्यास पिण्याचे पाणी उपलब्ध करून देण्यात येते. त्या दृष्टीने हा प्रकल्प महत्त्वाचा आहे. या प्रकल्पासाठी मोठा निधी मिळाल्याने पुढील कामे मार्गी लागणार आहेत.

# युवक काँग्रेसच्या बैठकीत राडा




- एकमेकांवर फेकल्या खुर्च्या
- गटबाजी आली चव्हाट्यावर

**मुंबई : प्रतिनिधी**

महाराष्ट्र प्रदेश युवक काँग्रेसच्या कार्यकारिणीची शनिवारी (दि. १७) झालेली बैठक वादळी ठरली. या बैठकीवेळी वादावादी होऊन कार्यकर्त्यांनी एकमेकांवर चक्क खुर्च्यांची फेकाफेक केली. त्यामुळे या पक्षातील अंतर्गत वाद चव्हाट्यावर आला आहे.

युवक काँग्रेसमधील एका गटाचा अध्यक्ष कुणाल राऊत यांना विरोध आहे. त्यातून हा गट राऊत यांच्याविरोधात आक्रमक झाला. राऊत यांच्या कार्यपद्धतीवर या गटाची नाराजी असून त्यातील काही जणांनी थेट राऊत यांना बदलण्याची मागणी केली. यावरून तणाव निर्माण होऊन दोन गट आमनेसामने आले. या वेळी कार्यकर्त्यांनी एकमेकांवर खुर्च्या फेकल्या.

राडा झाला तेव्हा युवक काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष बी. व्ही. श्रीनिवास हे तिथे उपस्थित होते, मात्र या प्रकारानंतर ते तिथून तातडीने निघून गेले. बाहेर पडताना त्यांनी कुठलीही प्रतिक्रिया दिली नाही. त्यामुळे आता हायकमांड काय कारवाई करणार याकडे लक्ष लागले आहे.



## औरंगजेबाच्या कबरीसमोर प्रकाश आंबेडकर झुकले

**खुलताबाद : प्रतिनिधी**

अलीकडील काही दिवसांपासून औरंगजेबाचे स्टेटस ठेवल्यावरून वातावरण तापलेले असतानाच वंचित बहुजन आघाडीचे अध्यक्ष प्रकाश आंबेडकर यांनी शनिवारी (दि. १७) औरंगजेबाच्या कबरीला भेट दिली आहे. त्यामुळे नव्या वादाला तोंड फुटण्याची शक्यता आहे.

या वेळी प्रकाश आंबेडकर यांनी औरंगजेबाच्या कबरीला फुलेही अर्पण केली. विशेष म्हणजे प्रकाश आंबेडकर हे सध्या उद्धव ठाकरे गटाबरोबर आहेत.

# पनवेलमध्ये आज संयुक्त मोर्चा संमेलन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

देशाचे कार्यकुशल पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील केंद्र सरकारला नऊ वर्षे पूर्ण झाली आहेत. या काळात देशाच्या विकासाची मोठी पावले उचलतानाच जागतिक स्तरावर भारताची मान उंचावण्याचे काम पंतप्रधान मोदींनी केले. त्या अनुषंगाने योजना, विकासकामे, निर्णयांची माहिती जनतेपर्यंत पोहचविण्यासाठी भाजपतर्फे मोदी @ ९ महाजनसंपर्क अभियानांतर्गत रविवारी (दि. १८) सकाळी १०.३० वाजता उरण विधानसभा क्षेत्राचे संयुक्त मोर्चा संमेलन पनवेलमध्ये आयोजित करण्यात आले आहे.

पनवेल शहरातील मार्केट यार्डमधील श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाच्या सभागृहात भाजपचे रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांच्या अध्यक्षतेखाली व आमदार महेश बालदी यांच्या प्रमुख उपस्थितीत संयुक्त मोर्चा संमेलन होणार असून या संमेलनास प्रमुख पाहुणे म्हणून भाजपचे ज्येष्ठ नेते बाळासाहेब पाटील, पनवेल तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत, उरण तालुका अध्यक्ष रवी भोईर, शहर अध्यक्ष कौशिक शाह, खालापूर तालुका अध्यक्ष रामदास ठोंबरे, लोकसभा विस्तारक अविनाश कोळी, जिल्हा संघटन सरचिटणीस दीपक बेहेरे, जिल्हा सरचिटणीस नितीन पाटील, विनोद साबळे आदींची उपस्थिती असणार आहे.

## निवडक

### युगांडामध्ये शाळेवर हल्ला; २६ विद्यार्थ्यांचा मृत्यू

**कंपाला** : युगांडामधील अलायड डेमोक्रॅटिक फोर्स (एडीएफ) संघटनेच्या बंडखोरांनी शुक्रवारी रात्री एका शाळेवर केलेल्या सशस्त्र हल्ल्यात २६ विद्यार्थ्यांचा मृत्यू झाला आहे, तर सहा विद्यार्थ्यांचे अपहरण करण्यात आले आहे. काही विद्यार्थी जखमीही आहेत. एडीएफ ही 'इसिस'शी संबंधित संघटना आहे. या हल्लेखोरांचा शोध सुरू आहे.

### जुनागड येथे हिंसाचारात एकाचा मृत्यू, पोलीस जखमी

**जुनागड** : गुजरातमधील जुनागढ येथे दर्गा हटवण्यावरून शुक्रवारी (दि. १६) रात्री हिंसाचाराची घटना घडली. या घटनेत एक जणाचा मृत्यू, तर चार पोलीस कर्मचारी जखमी झाले आहेत. जमावाने घोषणाबाजी आणि दगडफेक केली तसेच पोलीस चौकीची तोडफोड करीत वाहनांना आग लावली. या प्रकरणी १७४ जणांना पोलिसांनी अटक केली आहे.



**पनवेल : भाजपचे नवीन पनवेल येथील ज्येष्ठ कार्यकर्ते जगदिश घरत यांच्या ५५व्या वाढदिवसानिमित्त शनिवारी आयोजित अभीष्टचिंतन सोहळ्यात माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी शुभेच्छा दिल्या. या सोहळ्यास आमदार प्रशांत ठाकूर, माजी सभागृह नेते परेश ठाकूर, माजी नगराध्यक्ष संदीप पाटील, माजी नगरसेविका सुशीला घरत, विजय म्हात्रे, प्रदीप ठाकूर, विजय जामसुदकर, शेष नाथ, सुनील पाटील, विष्णू गवस, हरिश्चंद्र ठाकूर, दत्ता झाल्टे, राजेंद्र सोनावणे यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.** **(अधिक छायाचित्रे पान ३ वर..)**

# पनवेल बसस्थानकात स्वच्छता अभियान

## आगार बांधकामासाठी ठेकेदार नेमण्याची प्रक्रिया सुरू -आमदार प्रशांत ठाकूर





**पनवेल : प्रतिनिधी**

पनवेल एसटी बसस्थानकात प्रवेश केल्यावर प्रवाशांना समाधान वाटले पाहिजे यासाठी माजी नगरसेवक ॲड. मनोज भुजबळ यांच्या नेतृत्वाखाली प्रवासी वाहतूक सामाजिक संस्था चांगले कार्य करीत आहे. त्यांना माझे संपूर्ण सहकार्य राहील. पनवेल आगाराच्या बांधकामासाठी परिवहन सचिवांना पत्र देऊन नवीन ठेकेदार नेमण्याची मागणी केली असून त्याची प्रक्रिया सुरू असल्याची माहिती आमदार प्रशांत ठाकूर यांनी शनिवारी (दि. १७) स्वच्छता अभियानावेळी दिली. **(पान २ वर..)**

*पनवेल बसस्थानकाच्या आवारात पूर्व बाजूला मोबाईल शौचालय ठेवल्यास प्रवाशांची सोय होईल व परिसरात दुर्गंधी होणार नाही. मोकळ्या जागेत बगीचा बनवण्याचा प्रस्तावही चांगला आहे. माझ्याकडे दोन संस्थांनी बगीचासाठी जागा देण्याची मागणी केली आहे. मी आजच त्यांना जागा दाखवून येथे बगीचा बनवण्यास सांगतो.*

**–परेश ठाकूर,** माजी सभागृह नेते, पनवेल महापालिका

*प्रवासी वाहतूक सामाजिक संस्थेने पनवेल बसस्थानक स्वच्छ करण्यासाठी राबविलेल्या अभियानामुळे परिसर स्वच्छ झाला. आमदार प्रशांत ठाकूर व माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांनी मोबाईल शौचालय आणि बगीचा तयार करण्यासाठी सहकार्य करण्याची तयारी दाखविल्याने आम्हालाही काम करण्याची स्फूर्ती मिळाली.*

**–सुजीत डोळस,** आगार प्रमुख

# बिपरजॉय चक्रीवादळामुळे मान्सून लांबणीवर

**मुंबई : प्रतिनिधी**

बिपरजॉय चक्रीवादळाचा परिणाम गुजरातसह संपूर्ण देशाच्या हवामानावर होत आहे. देशात काही भागात ऊन, तर काही भागात पाऊस अशी परिस्थिती पहायला मिळत आहे. दरम्यान, मान्सून पुन्हा एकदा लांबण्याचा अंदाज हवामान विभागाने वर्तवला आहे. आता २३ जूननंतर पावसाला पुन्हा सुरुवात होईल, असे हवामान विभागाने म्हटले आहे.



सध्या राज्यासह देशात होणारा पाऊस हा चक्रीवादळाचा होणार परिणाम आहे. मान्सून सध्या स्थिरावला असून २३ जूनला महाराष्ट्र आणि मध्य भारतात पावसाला सुरुवात होण्याची शक्यता आहे, अशी माहिती हवामान विभागाने दिली आहे. दरम्यान, दक्षिण आणि ईशान्य भारतात १८ ते २१ जूनदरम्यान पावसाच्या सरी कोसळण्याची शक्यता आहे.

मान्सून पुन्हा एकदा लांबल्यामुळे नागरिकांची निराशा झाली असून बळीराजाच्या चिंतेतही वाढ झाली आहे. राज्यातही अनेक भागात अद्याप मान्सून दाखल झालेला नाही. कोकण आणि मध्य महाराष्ट्रात पावसाने तुरळक हजेरी लावली आहे. विदर्भासह मराठवाड्यातील शेतकऱ्यांची प्रतीक्षा मात्र कायम आहे.

हवामान विभागाने दिलेल्या माहितीनुसार या आठवड्यात पावसाची शक्यता नाही. त्यानंतरच्या दुसऱ्या आणि तिसऱ्या आठवड्यात जोरदार पावसाची शक्यता असून त्या पुढील आठवड्यात सरासरी पाऊस पडेल. त्यामुळे शेतकऱ्यांनी पेरणी न करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

### तापमानात वाढ

राज्यातील तापमानात सातत्याने चढ-उतार होत आहे. सध्या बहुतांश भागात उन्हाचा चटका जाणवत आहे. याचा नागरिकांना त्रास सहन करावा लागत आहे. दरम्यान, पुढील दोन दिवस विदर्भात उष्णतेच्या लाटेचा इशारा हवामान विभागाने दिला आहे. पुढील दोन दिवस विदर्भासाठी उष्णतेचा ऑरेंज अलर्ट जारी करण्यात आला आहे. जूनचा दुसरा आठवडा ओलांडला असून मान्सून अद्याप सक्रिय झालेला नाही. त्यामुळे विदर्भात तापमान सरासरीपेक्षा पाच ते सात अंशानी जास्त आहे.

## जागतिक योग दिनानिमित्त

# चलो प्रबळगड!

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जागतिक योग दिनानिमित्त २१ जून रोजी सकाळी ६ वाजता भाजपचे रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांच्या समवेत माची प्रबळगड येथे योगासने करण्याची संधी मिळणार आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या पुढाकाराने २१ जून हा दिवस जागतिक योग दिन म्हणून संपूर्ण जगभर साजरा केला जातो. त्या अनुषंगाने माची प्रबळगड येथे योग दिन साजरा केला जाणार आहे. यामध्ये आमदार प्रशांत ठाकूर यांच्या समवेत युवा व ज्येष्ठ योगासने करणार आहेत. या उपक्रमात सहभागी होण्यासाठी व अधिक माहितीसाठी युवा मोर्चाचे तालुकाध्यक्ष आनंद ढवळे (९७७३९४७७७७) किंवा शहराध्यक्ष रोहित जगताप (८६९१९३०७०९) यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.





**जेजुरी : आषाढी एकादशी सोहळ्यासाठी पंढरपूरला जाणाऱ्या संत ज्ञानेश्वर महाराजांच्या पालखीतील वारकऱ्यांना पनवेल येथील ठाकूर इन्फ्राप्रोजेक्ट्स प्रा. लि.(टीआयपीएल) तर्फे बिस्कीटे व पाण्याच्या बाटल्यांचे वाटप करण्यात आले. या वेळी टीआयपीएलचे स्वप्नील ठाकूर, अजय पाटील, आर. जी. पाटील व कर्मचारी उपस्थित होते.**

# रत्नागिरी वैद्यकीय महाविद्यालयासाठी १०५ कोटी

## ■ ४४८ पदनिर्मितीही करणार; वैद्यकीय शिक्षणमंत्री गिरीष महाजन यांची माहिती

**मुंबई : प्रतिनिधी**

रत्नागिरी येथे १०० विद्यार्थी क्षमतेसह संलग्नीत ४३० खाटांचे रुग्णालय सुरू करण्यास मागील वर्षी मान्यता देण्यात आली होती. आता रत्नागिरी वैद्यकीय महाविद्यालयासाठी ४४८ पदनिर्मितीस मान्यता देण्यात आली असून याकरीता १०५.७८ कोटी रु. खर्चासही मान्यता देण्यात आली असल्याची माहिती वैद्यकीय शिक्षणमंत्री गिरीष महाजन यांनी माहिती दिली.

मंत्री गिरीष महाजन म्हणाले की, युती शासनाचा मागील नऊ वर्षांत १० शासकीय वैद्यकीय महाविद्यालये सुरू करण्यात आले आहेत. रत्नागिरी येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या तसेच सिंधुदुर्ग येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयास संलग्नित ५०० रुग्णखाटांच्या रुग्णालयाच्या रुपात कोकणवासीयांना शासनाने दुहेरी आरोग्यदायी भेट दिली असल्याचे त्यांनी सांगितले. त्यामुळे दरवर्षी हजारो नवीन डॉक्टर्स निर्माण होवून राज्यभर आरोग्य सेवेचा विस्तार होणार आहे.

रत्नागिरी येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय सन २०२३-२०२४ या शैक्षणिक वर्षापासून सुरु करण्यास केंद्राचा हिरवा कंदील मिळाला असून या शैक्षणिक वर्षापासून प्रथम वर्षाचे प्रवेश सुरू होणार असल्याचे मंत्री



महाजन यांनी सांगितले. याचबरोबर सिंधुदुर्ग येथे नवीन शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाशी संलग्नित ५०० रुग्णखाटांच्या रुग्णालयाकरीता आवश्यक एकूण १०८६ पदनिर्मीतीसही मान्यतेचा शासन निर्णय काढण्यात आला असून त्यापोटी १०९.१९ कोटी रुपयांचा भार शासनाच्या तिजोरीवर पडणार आहे. सिंधुदुर्ग येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय यापूर्वीच सुरू झाले आहे.

रत्नागिरी येथील १०० विद्यार्थी क्षमतेचे नवीन शासकीय महाविद्यालय व सिंधुदुर्ग येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाशी संलग्नित ५०० रुग्णखाटांचे रुग्णालय सुरू झाल्याने कोकणवासीयांना वैद्यकीय शिक्षण मंत्री गिरीष महाजन यांच्याकडून दुहेरी भेटच मिळाली आहे.

कोकणातील ग्रामीण भागातील नागरिकांना आरोग्यविषयक चांगल्या सोयीसुविधा मिळणार असून कोकणातील सर्वसामान्य नागरिकांना विशेषोपचार आरोग्य सुविधा माफक दरात उपलब्ध होणार आहेत. यामुळे नागरिकांच्या आरोग्यावरील खर्चात बचत होणार आहे. कोकणातील आसपासच्या ग्रामीण भागातील नागरिकांना आरोग्यविषयक चांगल्या सोयीसुविधा मिळण्याचा मार्ग आता मोकळा झाला असून या महत्त्वपूर्ण निर्णयाचे सामान्य नागरिकांतून स्वागत केले जात आहे.

# योगदिनानिमित्त भाजपतर्फे राज्यभर विशेष कार्यक्रम



## महिला मोर्चा प्रदेशाध्यक्ष चित्रा वाघ यांची माहिती

**मुंबई : प्रतिनिधी**

आंतरराष्ट्रीय योगदिनी राज्यात भाजपतर्फे योग रिल स्पर्धेसोबतच अन्य विशेष कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे, अशी माहिती भाजप महिला मोर्चा प्रदेशाध्यक्ष आणि या कार्यक्रमाच्या प्रदेश संयोजक चित्रा वाघ यांनी शनिवारी (दि. १७) दिली. भाजप प्रदेश कार्यालयात झालेल्या पत्रकार परिषदेत त्या बोलत होत्या.

महिला मोर्चा प्रदेश उपाध्यक्षा वर्षा भोसले व प्रदेश सरचिटणीस रश्मी जाधव यावेळी उपस्थित होत्या. यंदा 'वसुधैव कुटुम्बकम्' या कल्पनेवर आधारीत आंतरराष्ट्रीय योग दिवस जगभर साजरा होणार आहे. २१ जून रोजी सकाळी ९.०९ मिनिटांनी आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त होणाऱ्या विविध कार्यक्रमांमध्ये मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहनही वाघ यांनी केले.

वाघ म्हणाल्या की, एखाद्या कुटुंब प्रमुखाप्रमाणे पंतप्रधान नरेंद्र मोदी देशवासियांची काळजी घेत आहेत. त्यांच्या नेतृत्वाखाली भारताचे नवनिर्माण होत आहे आणि देशाची प्रगती वेगाने होत आहे. तणावमुक्त जीवनासाठी आवश्यक योग साधनेचे महत्व पटवून देण्यासाठी हा दिवस जगभर साजरा केला जातो. मोदी सरकारच्या नवव्या वर्षपूर्तीनिमित्त राबवल्या जाणाऱ्या उपक्रमांतर्गत यंदा विविध कार्यक्रम सादर होणार आहेत. एक इन्स्टा रीलची स्पर्धा घेण्यात येणार असून, २१ जूनपर्यंत सर्वांनी @BJP4Maharashtra या इन्स्टाग्राम अकाउंटवर योगसाधना करतानाचे रील पोस्ट करावेत असे आवाहन त्यांनी केले. रीलचे हॅशटॅग Yogafor9@9 हे असेल व ज्या रीलला सर्वाधिक लाइक्स व जे रील सर्वाधिक रीट्वीट केले जातील अशा रील्सना भाजप लोकप्रतिनिधींमार्फत बक्षीस दिले जाणार आहे. या दिवशी नऊ मिनिटांचा पॉवर योगासनांचा कार्यक्रमही सादर आहे. त्याचबरोबर गेट वे ऑफ इंडीया इथे ९.०९ मि. नी ९० महिला नऊवारी नेसून अभिनव पद्धतीने योग प्रात्यक्षिके सादर करणार आहेत, असेही त्यांनी नमूद केले.

राज्यात १९ जूनला महाराष्ट्रातील महिलांसाठी सहकारी संस्थांचे एक दिवसीय प्रशिक्षण शिबिर घेण्यात येईल, अशी माहितीही वाघ यांनी दिली. आमदार प्रवीण दरेकर यांच्या संकल्पनेतून होणाऱ्या या शिबिरामध्ये भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे आणि महिला व बालविकासमंत्री मंगलप्रभात लोढा उपस्थित राहणार आहेत.

# रायगडातील वन्यप्राण्यांच्या बचावासाठी रुग्णवाहिका

**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यात वन्यप्राण्यांच्या बचावासाठी वनविभागाच्या खारफुटी व सागरी जैवविविधता प्रतिष्ठानच्या सहकार्याने संजय गांधी राष्ट्रीय उद्यान, बोरीवली यांच्या माध्यमातून रुग्णवाहिका पुरविली आहे.

एक वर्षापूर्वी दाखल झालेल्या या रुग्णवाहिकेने अनेक वन्यजीवांचे प्राण वाचवण्यास मदत केली. येथील विभागीय वनाधिकारी कार्यालयात ही रुग्णवाहिका दाखल झाल्याने वनविभागाच्या ताफ्यात ही रुग्णवाहिका कार्यरत आहे. निसर्ग संपन्नतेने समृद्ध असलेल्या कोकणात हिंस्त्र व इतर



वन्यप्राण्यांचा वावर मोठ्या प्रमाणात आहे. अनेक वेळा मानवी वस्तीमध्ये देखील हे हिंस्र पशु भूक भागवण्यासाठी येत असतात. अनेक वेळा मनुष्यावर देखील ते हल्ले करताना दिसतात. मनुष्य वस्तीतदेखील अशा प्राण्यांना हुसकावून लावण्यासाठी आणि आपला जीव वाचवण्यासाठी प्राण्यांवर प्रतिहल्लादेखील केला जातो. त्यामुळे अशा जखमी, संकटात सापडलेल्या अथवा लोकवस्तीत शिरलेल्या वन्यप्राण्यांचा बचाव करून सुरक्षितरित्या त्यांच्या नैसर्गिक अधिवासामध्ये मुक्त करण्याचे काम सध्या खासगी वाहनाने केले जाते.

खासगी वाहनाची रचना आणि त्यामध्ये पिंजरा ठेवताना फार अडचणी निर्माण होतात. एकप्रकारे कसरतच करावी लागते. अशा परिस्थितीत वन्यजीव रुग्णवाहिकेचा वापर सार्थकी लागणार आहे. वनविभागाच्या खारफुटी व सागरी जैवविविधता प्रतिष्ठानच्या सहकार्याने बोरीवली येथील संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाच्या माध्यमातून सागरी जिल्ह्यांसाठी प्रत्येकी एक वन्यजीव रूग्णवाहिका पुरविली आहे. यामध्ये रायगड, रत्नागिरी आणि सिंधुदुर्गचा समावेश केला गेला आहे. त्यामुळे ही वन्य जीवांसाठी वापरण्यात येणारी रुग्णवाहिका अनेकांचे प्राण वाचवण्यासाठी, त्यांच्या उपचारासाठी उपयुक्त ठरणार आहे.

**वन्यजीवांना वाचवण्यासाठी तत्काळ मदत मिळण्यासाठी ही रुग्णवाहिका उपयुक्त ठरत आहे. यात प्राथमिक उपचाराच्या सुविधा आहेत. या रुग्णवाहिकेतून वन्यजीवांना वाचवण्यात यश आलेले आहे.**
**-नरेश पाटील, वनक्षेत्रपाल,अलिबाग**

## गांजा बाळगल्याप्रकरणी एक जणाला अटक

**पेण** : तालुक्यातील पाटणेश्वर येथील एका इसमाला गांजा बाळगल्याप्रकरणी पेण पोलिसांनी ताब्यात घेतले आहे.

याबाबत माहिती अशी की, आरोपी रा. पाटणेश्वर ता. पेण याच्याकडे गुरवारी (दि. १५) रात्रौ १०.४० वा. सुमारास पोलिसांनी तपासणी केली असता त्याचाकडे ६०० ग्रॅम वजनाचे अवैध गांजा विक्री करण्याकरीता आणलेला पोलिसांना सापडला. पोलिसांनी आरोपीला अटक केली असून त्याच्या विरोधात पेण पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अधिक तपास पोलीस उपनिरीक्षक समद बेग हे करीत आहेत.

# लोकनेते दि. बा. पाटील यांच्या स्मृतिदिनानिमित्त रक्तदान शिबिर व रोजगार मेळावा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

लोकनेते दि. बा. पाटील यांच्या १०व्या स्मृतिदिनानिमित्त २४ जून रोजी पनवेल-उरण आगरी समाज मंडळाच्या पनवेल येथील कार्यालयात भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. याच दिवशी महात्मा फुले सभागृहात रोजगार मेळाव्याचेही आयोजन लोकनेते दि. बा. पाटील सर्वपक्षीय कृती समितीच्या वतीने करण्यात आले आहे.

रक्तदान शिबिराला लोकनेते दि. बा. पाटील सर्वपक्षीय कृती समिती, श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ, जे. एम. म्हात्रे चॅरिटेबल ट्रस्ट, आगरी-कोळी-कराडी संघर्ष सामाजिक संस्था, कच्छ युवक संघ-अँकरवाला रक्तदान अभियान, महात्मा फुले सा. प्र. प. प्रतिष्ठान जासई, दुर्ग मावळा प्रतिष्ठान, आम्ही पिरकोनकर समूह, शाक्त शिवराज्याभिषेक समारंभ समिती, स्थानिक प्रकल्पग्रस्त रिक्षा चालक मालक संघटना जुई कामोठे, सह्याद्री मित्र मंडळ, भिंगारवाडी आदी संस्थांचे सहकार्य लाभणार आहे.

रक्तदात्यांना सन्मानपत्र व भेटवस्तू देऊन सन्मानित करण्यात येणार आहे. जास्तीत जास्त तरुण-तरुणांनी रक्तदान व रोजगार मेळाव्यात सहभागी व्हावे, असे आवाहन मंडळाचे अध्यक्ष अतुल दि. पाटील, उपाध्यक्ष जे. डी. तांडेल, चेतन साळवी, अनंतराव पाटील, सचिव बी. पी. म्हात्रे, कोषाध्यक्ष व शिबिर संयोजक विजय गायकर यांनी केले आहे.

# नवी मुंबईच्या आकर्षक नकाशाची थ्रीआर अंतर्गत निर्मिती

## टाकाऊ संगणकीय साहित्यापासून बनवली प्रतिकृती

**नवी मुंबई : बातमीदार**

पूर्वेकडील सह्याद्रीच्या डोंगररांगा आणि पश्चिमेकडील खाडीकिनारा यामध्ये वसलेले नवी मुंबई शहर सुनियोजित बांधणीचे आधुनिक शहर म्हणून नावाजले जाते. १०९.५९ चौ. किमी. क्षेत्रात विस्तारलेली नवी मुंबई दिघा, ऐरोली, घणसोली, कोपरखैरणे, तुर्भे, वाशी, नेरुळ, बेलापूर अशा आठ विभागांत सामावलेली आहे. अशा नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्राचे विहंगम दर्शन घडविणारा नकाशा नुकताच महापालिका आयुक्त राजेश नार्वेकर यांच्या दालनात प्रदर्शित करण्यात आला आहे.



या नकाशाचे वैशिष्ट्य म्हणजे त्याची निर्मिती टाकाऊ संगणकीय साहित्यापासून करण्यात आलेली आहे.

नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्राचा पाच फूट उंचीचा नादुरूस्त संगणक व लॅपटॉपधील मदरबोर्ड व इतर साहित्यापासून तयार केलेला नकाशा महापालिका मुख्यालयातील आयुक्त राजेश नार्वेकर यांच्या दालनात प्रदर्शित करण्यात आला आहे. २३ निरुपयोगी लॅपटॉप, संगणकातील सर्कीट बोर्ड, कन्डेन्सर बॅटरी व वायर्स यांचा वापर करून बनविलेला हा नवी मुंबईचा नकाशा त्याच्या आगळ्या वेगळ्या स्वरुपामुळे लक्ष वेधून घेतो.

नवी मुंबईतील वेस्ट टू बेस्ट आर्टीस्ट किशोर बिश्वास यांनी आपल्या सहकाऱ्यांसह मदर इंडिया बोर्ड नकाशासारखाच हा नवी मुंबईचा नकाशाही टाकाऊ वस्तूंपासून बनविलेला असून त्यामुळे आयुक्त दालनाची शोभा वाढली आहे.

# संभाजीराजे छत्रपतींकडून रायगड परिसरातील दरडीची पहाणी



**महाड : प्रतिनिधी**

किल्ले रायगडावरून दरड कोसळून झालेल्या दुर्घटनेनंतर शनिवारी (दि. १७) रायगड विकास प्राधिकरणाचे अध्यक्ष छत्रपती संभाजीराजे यांनी किल्ले रायगडला भेट देऊन कोसळलेल्या दरड भागाची पाहणी केली, तसेच स्थानिकांची भेट घेतली.

किल्ले रायगडावर ३५०वा राज्याभिषेक मोठ्या उत्साहात झाला. जवळपास ४.८ लाख शिवभक्त या वेळी किल्ले रायगडावर राज्याभिषेक सोहळ्यात सहभागी झाले. दरम्यान एवढ्या गर्दीने रायगडदेखील गुदमरून गेला. परिणामी दरड कोसळण्यासारख्या घटना घडू लागल्या. एका दरडीने शिवभक्ताचा जीव घेतला तर नुकतीच पडलेल्या एक दरडीने तीन वाहनांचे नुकसान करून एका स्थानिक नागरिकाच्या दुकानाची भिंत पाडली.

याप्रकरणी शनिवारी छत्रपती संभाजी राजे यांनी चित्तदरवाजा येथील कोसळलेल्या दरडीची पाहणी केली. राजे यांनी चित्तदरवाजा व नाणे दरवाजा मार्ग पावसाळ्यात बंद करून या ठिकाणी कायम पोलीस पहारा ठेवण्याच्या सूचना प्रशासनाला दिल्या.

### पाचाड येथे जिजाऊंना अभिवादन

**राष्ट्रमाता जिजाऊ माँ साहेब यांची ३५०वी पुण्यतिथीनिमित्त पाचाड येथे संभाजी राजे छत्रपती यांनी जिजाऊंना अभिवादन केले. राष्ट्रमाता राजमाता जिजाऊ यांच्या स्मृतिदिनानिमित्त लखोजी राजांचे वंशज व शिवाजीराव जाधवराव हे दरवर्षी बुलढाणा येथून लोकोजी राजांच्या वाड्यातून जल घेऊन येतात व जिजाऊंची मूर्ती रॅलीमध्ये आणली जाते. त्या पाण्याचा जलाभिषेक पाचाड येथे करण्यात येतो व त्या सर्व कार्यक्रमाला सहकार्य सर्व ३० जिल्ह्यांमध्ये होत असते. जिजाऊंची समाधी फुलमाळांनी सजवून सुशोभित करण्यात आली होती.**



पान १ वरून

## पनवेल बसस्थानकात स्वच्छता अभियान

हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे स्वच्छ, सुंदर बसस्थानक अभियानांतर्गत पनवेल एसटी बसस्थानक चकाचक करण्यासाठी प्रवासी वाहतूक सामाजिक संस्थेने अध्यक्ष ॲड. मनोज भुजबळ यांच्या नेतृत्वाखाली पुढाकार घेऊन शनिवारी सकाळी आवारातील कचरा, गवत आणि झुडपे साफ केली. या वेळी आमदार प्रशांत ठाकूर, महापालिका माजी सभागृह नेते परेश ठाकूर, संस्थेचे अध्यक्ष ॲड. भुजबळ, माजी नगरसेविका ॲड. वृषाली वाघमारे, संस्थेचे सदस्य डॉ. मनीष बेहरे, उपेंद्र मराठे, के. जी. म्हात्रे, अशोक आंबेकर, उत्कर्ष सांस्कृतिक कला आणि क्रीडा मंडळाचे अध्यक्ष राकेश भुजबळ, महापालिकेचे शैलेश गायकवाड, एसटी आगार प्रमुख सुजीत डोळस, स्थानक प्रमुख ज्ञानेश्वर म्हात्रे उपस्थित होते.

बसस्थानकातून घाटमाथ्यावर जाणाऱ्या गाड्या जिथे उभ्या राहतात तिथे फलाटाच्या बाजूला असलेल्या मोकळ्या जागेत अनेक वेळा प्रवासी विधी करतात. त्यामुळे परिसरात दुर्गंधी पसरते. म्हणूनच पूर्व बाजूला पुरुष व महिलांसाठी मोबाईल शौचालयाची महापालिकेतर्फे सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी व स्वच्छतेचा संदेश देणाऱ्या जाहिराती तेथील भिंतींवर रंगवण्यासाठी महापालिकेला पत्र देऊन मागणी करण्याची ठरले. पूर्व बाजूला छोटासा बगीचा केल्यास प्रवासी त्या ठिकाणी विधी करणार नाहीत, म्हणून तसा प्रस्ताव आमदार प्रशांत ठाकूर यांना सांगताच त्यांनी माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांना तेथे बगीचा करून देण्यास सांगितले.

पनवेल बसस्थानकात पूर्व बाजूला कल्याणला जाणाऱ्या गाड्या लागतात. त्याच्यासमोर सामाजिक संस्थेमार्फत बगीचा बनविण्यात येणार आहे. त्यामध्ये हिरवेगार गवत व फुलांची झाडे लावण्यात येणार आहेत. त्यामुळे तो परिसर स्वच्छ राहिल व वातावरण ही प्रसन्न असेल.

# रामशेठ ठाकूर महाविद्यालयात इंडक्शन प्रोग्रॅम

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या खारघर येथील रामशेठ ठाकूर वाणिज्य व शास्त्र महाविद्यालयात शनिवारी (दि. १७)व्यवसाय विभाग व व्यवस्थापन शिक्षण विभाग या दोन्ही विभागाच्या वतीने द्वितीय वर्षाच्या व तृतीय वर्षाच्या विद्यार्थी व विद्यार्थिनींसाठी इंडक्शन प्रोग्रामचे आयोजन केले होते.

या कार्यक्रमाचा प्रमुख उद्देश महाविद्यालयातील व्यवसाय, अकाउंट व फायनान्स व व्यवस्थापन शिक्षण विभागातील द्वितीय व तृतीय वर्षाच्या विद्यार्थी व विद्यार्थिनींना वेगवेगळ्या विषयांची तसेच वेगवेगळ्या कोर्ससबद्दल माहिती व्हावी हे होते. या इंडक्शन प्रोग्रामसाठी महाविद्यालयातील व्यवस्थापन शिक्षण विभाग, अकाउंट व फायनान्स व व्यवसाय विभागातील द्वितीय व तृतीय वर्षातील विद्यार्थी व विद्यार्थिनींनी उपस्थिती दर्शवली.



महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. रूपेंद्र गायकवाड यांनी या वेळी उपस्थित राहून या इंडक्शन प्रोग्रॅमच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या सर्वांगिण विकासासाठी महाविद्यालयांमध्ये घेण्यात येणारे वेगवेगळे उपक्रम तसेच वेगवेगळ्या प्रोग्रॅम्सबद्दल, घेण्यात येणाऱ्या वेगवेगळ्या परीक्षा, मूल्यमापन पद्धती याबाबत माहिती विद्यार्थ्यांना दिली व शुभेच्छा दिल्या.

कार्यक्रमासाठी व्यवस्थापन शिक्षण विभाग प्रमुख प्रा. रीत ठुले, अकाउंट व फायनान्स विभाग प्रमुख प्रा. प्रवर शर्मा व व्यवसाय विभाग प्रमुख प्रा. नम्रता पारीक, प्रा. महेश्वरी झिरपे, तसेच तिन्ही विभागातील सर्व प्राध्यापक वृंद तसेच शिक्षकेतर कर्मचारी यांनी कार्यक्रमासाठी उपस्थित राहून सहकार्य केले.

# मुंबईतील प्रमुख रेल्वेस्थानकांवर अत्याधुनिक नर्सिंग पॉड्स

**रोहे : प्रतिनिधी**

स्तनपान करणाऱ्या महिलांना आराम आणि आधार प्रदान करण्याच्या उद्देशाने महत्त्वपूर्ण उपक्रमात, भारतीय रेल्वेच्या मुंबई विभागाने सात प्रमुख रेल्वे स्थानकांवर १३ अत्याधुनिक नर्सिंग पॉड्स बसवण्याची घोषणा केली आहे. नॅशनल इनिशिएटिव्ह फॉर फीडिंग अँड रेस्टिंग इन्फ्रास्ट्रक्चर फॉर स्टेशन्स धोरणांतर्गत स्थापन करण्यात आलेल्या या समर्पित जागेत प्रवास करताना मातांना त्यांच्या अर्भकांना सुरक्षितपणे स्तनपान देता येणार आहे.

या योजनेंतर्गत, छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस येथे एक नर्सिंग पॉड स्थापित करण्यात आला आहे, तर दादर आणि लोकमान्य टिळक टर्मिनस येथे प्रत्येकी तीन स्थापित केले आहेत, ठाणे येथे दोन आणि कल्याण आणि पनवेलमध्ये प्रत्येकी एक तसेच लोणावळ्यात लवकरच दोन नर्सिंग पॉड असतील. या धोरणात्मक वितरणाचे उद्दिष्ट संपूर्ण मुंबई विभागातील स्तनपान करणाऱ्या महिलांच्या गरजा पूर्ण करणे आहे.

प्रत्येक नर्सिंग पॉड माता आणि त्यांच्या बाळांना स्तनपानाचा अनुभव वाढविण्यासाठी डिझाइन केलेल्या अनेक सुविधा प्रदान करेल. आरामदायी उशी असलेली बसण्याची जागा, डायपर बदलण्यासाठी समर्पित स्टेशन, वायुवीजनासाठी पंखा, रोषणाईसाठी प्रकाश आणि वापरलेल्या डायपरच्या स्वच्छ विल्हेवाटीसाठी एक डस्टबिन असेल. या सुविधांची देखभाल परवानाधारक सेवा प्रदात्याकडून केली जाईल.

# पावसाचे पाणी साचू नये यासाठी नियोजन

## मॅनहोल कव्हर, संरक्षक जाळ्या बसविण्याबाबत पनवेल मनपाची बैठक

**पनवेल : प्रतिनिधी**

पनवेल महानगरपालिका हद्दीतील मलनि:सारण वाहिन्यांवरील व पुराचे पाणी येते त्या ठिकाणांवरील मॅनहोल्सवरील संरक्षक जाळी, मॅनहोल कव्हर बसविण्याची कार्यवाही करण्यासंदर्भात आयक्त गणेश देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली शुक्रवारी (दि.१६) शहर अभियंता संजय जगताप आणि उपायुक्त सचिन पवार यांच्या प्रमुख उपस्थितीत चारही प्रभाग कार्यालयांमध्ये बैठकीचे आयोजन करण्यात आले होते.



या वेळी कार्यकारी अभियंता संजय कटेकर, सहाय्यक आयुक्त डॉ. वैभव विधाते, उपअभियंता सुधीर सांळुखे, घनकचरा व स्वछता विभाग प्रमुख अनिल कोकरे, प्रभाग अधिकारी, कनिष्ठ अभियंता, सर्व स्वच्छता निरीक्षक, आरोग्य निरीक्षक, कंत्राटदार, पालिका अधिकारी-कर्मचारी उपस्थित होते.

रस्त्याच्या कडेला असणाऱ्या फुटपाथवरील पावसाचे पाणी वाहून जाणाऱ्या गटारीवरील तसेच पुराचे पाणी वाहून जाणाऱ्या चेंबर्सची झाकणे, मॅनहोलचे झाकणे चुकून उघडी राहिल्यास अनेकवेळा अनुचित प्रकार घडतात, हे अनुचित प्रकार घडू नये यासाठी त्यावर मॅनहोल कव्हर, संरक्षक जाळी बसवण्याबाबत संबधित प्रभागातील कंत्राटदारास या बैठकित सूचना देण्यात आल्या.

उच्च न्यायालय, मुंबई यांच्या आदेशान्वये मलनि:सारण वाहिन्यावरील मॅनहोलवर संरक्षक जाळी बसविण्याचे तातडीने कार्यवाही करण्याचे आदेश दिले होते. त्यानुसार शहर अभियंता संजय जगताप आणि उपायुक्त सचिन पवार यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये, कामोठे, कळंबोली, खारघर या चारही प्रभागांमध्ये तेथील प्रभाग अधिकारी, कनिष्ठ अभियंता सर्व स्वच्छता निरीक्षक, आरोग्य निरीक्षक, कंत्राटदार यांच्या उपस्थितीत बैठक घेण्यात आली. या बैठकीमध्ये त्या त्या प्रभागातील मॅनहोल्सची संख्या, ठिकाणे यांच्यावर चर्चा करण्यात आली, तसेच मलनिःसारण, पुराचे पाणी, स्ट्रॉर्म वॉटरवरील महत्त्वाच्या मॅनहोल्सवर तातडीने मॅनहोल्स कव्हर, संरक्षक जाळी बसविण्याकरिता कंत्राटदारास चार टिम करून येत्या तीन-चार दिवसांत तातडीने हे काम पूर्ण करण्याच्या सूचना या वेळी देण्यात आल्या.

प्रभाग अधिकाऱ्यांनी आरोग्य निरीक्षकांसोबत सर्वेक्षण करून मॅनहोल्सवरील माहिती मलनिस्सारण विभाग व बांधकाम विभागास देण्यास सांगितले जेणेकरून येत्या तीन- चार दिवसांत हे काम पूर्ण होऊ शकेल. कामांवर लक्ष ठेवून कंत्राटदारांकडून लवकरात लवकर काम पूर्ण करण्याच्या सूचना बैठकीत कनिष्ठ अभियंत्यास देण्यात आल्या. याचबरोबर महानगर गॅस पाइपलाइनसाठी खोदण्यात आले खड्डे लवकरात लवकर भरण्याच्या सूचना कनिष्ठ अभियंत्यास देण्यात आल्या.





**पनवेल : भाजपचे नवीन पनवेल येथील ज्येष्ठ कार्यकर्ते जगदिश घरत यांच्या ५५व्या वाढदिवसानिमित्त आयोजित अभीष्टचिंतन सोहळ्यात भाजपचे रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर, महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर, माजी नगराध्यक्ष संदीप पाटील यांच्यासह अनेक मान्यवरांनी त्यांचे अभिष्टचिंतन केले. या वेळी माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, माजी नगरसेविका सुशीला घरत, विजय म्हात्रे, प्रदीप ठाकूर, विजय जामसुदकर, शेष नाथ, सुनील पाटील, विष्णू गवस, हरिचंद्र ठाकूर, दत्ता झाल्टे, राजेंद्र सोनावणे यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.**

# काँग्रेसमधील गटबाजी पुन्हा चव्हाट्यावर

### भाजप सरचिटणीस विक्रांत पाटील यांचा आरोप

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

युवक काँग्रेसच्या राज्य कार्यकारणी बैठकीत दोन गटांच्या कार्यकर्त्यांमध्ये फ्री स्टाईल हाणामाऱ्या झाल्याची घटना नुकतीच घडली. पक्षात केवळ घराणेशाही सुरू असून प्रस्थापित नेत्यांच्याच मुलांना संधी दिली जाते, असा आरोप युवक काँग्रेसचेच पदाधिकारी करीत आहेत. यासाठीच शनिवारी (दि. १७) काँग्रेस राष्ट्रीय प्रभारी व नेत्यांसमोर कार्यकर्त्यांच्या हाणामाऱ्या झाल्या. त्यामुळे काँग्रेसमधील गटबाजीमुळे कार्यकर्तेही नाराज असून हाणामारीच्या घटनांमधून काँग्रेस युवकांना काय संदेश देऊ इच्छिते? असा सवाल भाजपचे प्रदेश सरचिटणीस विक्रांत पाटील यांनी केला आहे.



युवक काँग्रेसच्या राज्य कार्यकारिणी बैठकीत दोन गटाच्या कार्यकर्त्यांमध्ये फ्री स्टाईल हाणामाऱ्या झाल्याची घटना घडली. एकीकडे काँग्रेसचे कार्यकर्ते व पदाधिकारी आपआपसांत भांडत आहेत आणि दुसरीकडे काँग्रेसचे नेते राहुल गांधी भारत जोडो यात्रेची नौटंकी करीत आहेत.

राहुल गांधी यांनी आधी कार्यकर्त्यांची मन जोडण्याचा प्रयत्न करावा. काँग्रेसच्या घराणेशाही आणि अश्या हाणामारी संस्कृतीतून काँग्रेस नक्की युवांना काय संदेश देऊ इच्छिते? याचे उत्तर राहुल गांधी यांनी द्यावे आणि मगच इतरांवर टीका करावी, असा सल्लाही विक्रांत पाटील यांनी दिला आहे.

## मालाचे पैसे न देता फसवणूक; खारघर पोलीस ठाण्यात गुन्हा

**पनवेल : वार्ताहर**

बिलाची रक्कम न देता माल परस्पर विकून एक कोटी २४ लाख २३ हजार ३१७ रुपयांची फसवणूक केल्याप्रकरणी एकाविरोधात खारघर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

निर्मला पाटील या खारघर येथे राहत असून त्यांचे स्मार्ट डिजिटल नावाची फर्म आहे. त्यांच्याकडून डिजिटल सामान घेणाऱ्याचे ठाणे येथे दुकान आहे. तो बेलापूर येथे माल स्वीकारत असे. २०२२मध्ये वेगवेगळ्या तारखांना एक कोटी २४ लाख २३ हजार ३१७ रुपयांचा माल पाटील यांनी त्याला दिला, मात्र त्या मालाचे तो पैसे देत नसल्याने पाटील त्याच्याशी वारंवार संपर्क साधत होत्या, मात्र तो त्यांना प्रतिसाद देत नव्हता. त्यामुळे पैसे न देता माल परस्पर विकून टाकून विश्वासघात केल्याप्रकरणी त्याच्याविरोधात पाटील यांनी पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली.



**पनवेल : रयत शिक्षण संस्थेचे सचिव विठ्ठल शिवणकर यांनी शनिवारी 'रयत'चे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य लोकनेते रामशेठ ठाकूर यांची त्यांच्या निवासस्थानी सदिच्छा भेट दिली. या वेळी त्यांच्यामध्ये विविध विषयांवर चर्चा झाली.**
(छाया : विकास म्हात्रे)

## निवडक

### वशेणी येथे मोफत वह्यावाटप



**उरण** : वशेणी इतिहास संपादकीय मंडळाचे सदस्य तथा वशेणीचे स्व. डॉ. शरद गणपत पाटील यांच्या प्रथम पुण्यतिथी दिनानिमित्त डॉ. शरद पाटील परिवार यांच्या सौजन्याने इ. दहावीच्या मुलांना मोफत वह्यावाटप करण्यात आले. इ. दहावीत शिकणाऱ्या ५१ मुलांना डॉ. सिद्धराम पाटील यांच्या हस्ते वह्यांचे वाटप करण्यात आले. कार्यक्रमास डॉ. रविंद्र गावंड, गणेश मूर्तीकार जगन्नाथ म्हात्रे, पागोटे शाळेचे मुख्याध्यापक अनंत पाटील, माजी सरपंच संदेश गावंड, सारडे गावचे सामाजिक कार्यकर्ते समीर पाटील, विश्वास पाटील, लता ठाकूर, नितीन पाटील आदी उपस्थित होते.

### पनवेलमधून तरुणाचे अपहरण

**पनवेल** : शहर परिसरातून एक तरुणाचे अपहरण झाल्याची तक्रार त्याच्या कुटुंबियांनी पनवेल शहर पोलीस ठाण्यात दिली आहे. राजेश धुडीया राठोड (वय १७, रा. आझादनगर, रेल्वेस्टेशन पार्किंगजवळ) हा रागाने घरातून निघून गेला. त्यानंतर तो घरी परतला नसल्याने कोणीतरी अज्ञात व्यक्तीने त्याला पळवून नेल्याचे तक्रारीत म्हटले आहे. अल्पवयीन तरुणाचा रंग सावळा, अंगाने सडपातळ, दाढी बारीक, डोक्याचे केस बारीक कट केलेला, उंची अंदाजे १६० सेमी, उजव्या हाताचे मनगटावर साईबाबांचा फोटो गोंदलेला, अंगात सफेद फुल बाह्यांचा शर्ट, काळी फुल जिन्स पॅन्ट, पायात काळी स्लीपर आहे. या तरुणाबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास त्यांनी पनवेल शहर पोलीस स्टेशन (०२२-२७४५२३३३) किंवा पोलीस उपनिरीक्षक गणेश फरताडे (९८९२८४९२६२) यांच्याशी संपर्क साधावा.

### धाकटा खांदा येथून विवाहिता बेपत्ता

**पनवेल** : तालुक्यातील धाकटा खांदा परिसरातून एक विवाहिता कोणास काही एक न सांगता निघून गेली आहे.



याबाबत तिच्या कुटुंबियांनी कामोठे पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे. शिल्पा राजेंद्र विश्वकर्मा असे या महिलेचे नाव असून तिची उंची पाच फूट चार इंच, रंग गोरा, नाक सरळ, अंगाने मध्यम, अंगात पिंक ड्रेस, पायात पैंजण, लाल रंगाचा धागा, हिरव्या रंगाची चप्पल असून तिला भोजपुरी, हिंदी भाषा अवगत आहे. या महिलेबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास त्यांनी कामोठे पोलीस ठाणे किंवा पोना के. एम. पाटील यांच्याशी संपर्क साधावा.

# शाळाबाह्य विद्यार्थ्यांसाठी शाळा आपल्या दारी!

**पनवेल : वार्ताहर**



**सुधागड विद्यालयाचा शैक्षणिक उपक्रम**

शाळाबाह्य विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी सुधागड विद्यासंकुलातील प्राथमिक शिक्षकांनी शाळा आपल्या दारीचा अभिनव उपक्रम राबवून शाळाबाह्य विद्यार्थी शोधून काढले. यासाठी कळंबोलीतील मराठी प्राथमिक विद्यालयातील मुख्याध्यापिका हेमलता पाटील व त्यांच्या शिक्षक सहकाऱ्यांनी कळंबोली वसाहतीमधील विविध भागात फिरून विद्यार्थी शोध मोहीम घेऊन शाळेत न जाणारे विद्यार्थी शोधून त्यांना शाळेच्या प्रवाहात आणण्यासाठी प्रयत्न केले.

या विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी विद्यालयाच्या मुख्याध्यापिका हेमलता पाटील यांनी शिक्षकांना सूचना देऊन त्यांना विद्यालयात दाखल करण्याच्या सूचनाही दिल्या आहेत.

यासाठी विद्यालयातील सर्वच शिक्षकांनी विद्यार्थ्यांना शोधून काढून त्यांच्या पालकांचे प्रबोधन करून शाळेच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी विशेष प्रयत्न केले. या सर्व विद्यार्थ्यांना यावर्षी कळंबोली विद्यासंकुलामध्ये विविध विभागात सामावून घेतले जाणार आहे. नव्या शैक्षणिक वर्षाच्या पूर्वसंध्येला कळंबोली विद्यालयातील प्राथमिक विभागाच्या सर्वच शिक्षकांनी विद्यार्थी शोधमोहीम हाती घेतली.

विद्यालयातील शिक्षक एलआयजीए टाईप, जाधव वाडी तसेच विविध भागात फिरून शैक्षणिक अडचणीमुळे शाळेत न जाणाऱ्या विद्यार्थ्यांना शोधून काढले. तब्बल ८० विद्यार्थी हे शाळेत न जाणारे मिळून आले.

## सोनारी जि.प. शाळेचा अमृत महोत्सव उत्साहात

**उरण : बातमीदार**

तालुक्यातील सोनारी जिल्हा परिषद शाळेला ७५ वर्षे पूर्ण झाली त्यानिमित्ताने सोनारी ग्रामसुधारणा मंडळाचे अध्यक्ष राकेश कडू यांच्या अध्यक्षतेखाली विविध कार्यक्रम मोठ्या उत्साहात झाले. सोनारी ग्रामसुधारणा मंडळाच्या वतीने दहावी, बारावी व इतर गुणवंत विद्यार्थ्यांचा यथोचित सत्कार करण्यात आला.

यामध्ये दक्ष दीपक रसाळ इ. दहावी प्रथम, अक्षता परशुराम कडू इ. बारावी प्रथम, आदित्य कडू कॉम्प्युटर इंजिनिअर यांचा या वेळी सत्कार करण्यात आला. गावातील ज्येष्ठ नागरिक व माजी विद्यार्थ्यांचाही सत्कार करण्यात आला. कै. नरेश रघुनाथ कडू यांच्या स्मरणार्थ शाळेत या वर्षापासून इ. सातवीमधून प्रथम येणाऱ्या विद्यार्थाला १० हजार रुपयांची शिष्यवृत्ती देण्याचे सोनारी ग्रामसुधारणा मंडळाचे अध्यक्ष राकेश कडू यांनी जाहीर केले.

कार्यक्रमास मुख्याध्यापिका पुष्पलता ठाकूर, अलका कडू, विजया म्हात्रे, सुनंदा पाटील, मनिषा चव्हाण, वर्षा कडू, भाग्यश्री कडू, करिश्मा कडू, उपाध्यक्ष रवींद्र तांडेल, सेक्रेटरी साहील कडू, खजिनदार धर्मेंद्र कडू, पंच सुभाष कडू, ग्रामपंचायत सदस्य अंकुश तांडेल, स्कूल कमिटी चेअरमन सुजाता कडू व ज्येष्ठ नागरिक संघटनेचे पदाधिकारी, ग्रामस्थ उपस्थित होते.



## कळंबोलीत महापालिकेचे हॉस्पिटल सुरू करा

### स्त्री शक्ती फाउंडेशनची आयुक्तांकडे मागणी

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल महापालिका हद्दीतील कळंबोली वसाहतीमध्ये लवकरात लवकर पनवेल महापालिकेचे हॉस्पिटल सुरू करावे, अशी मागणी स्त्री शक्ती फाउंडेशनच्या संस्थापिका अध्यक्ष विजया कदम यांनी आयुक्तांकडे केली आहे.

त्यांनी दिलेल्या निवेदनात, कळंबोली वसाहतीची लोकवस्ती मोठ्या प्रमाणात वाढलेली आहे. या ठिकाणी प्राथमिक आरोग्य केंद्र वगळता शासकीय रुग्णालय नाही. प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये उपचारासाठी मर्यादा येतात. पनवेल उपजिल्हा रुग्णालयातही मोठ्या प्रमाणात गर्दी असते. त्याचप्रमाणे ते कळंबोलीपासून दूर असल्याने सर्वसामान्य नागरिकांना त्या ठिकाणी जाता येत नाही. या आर्थिक वर्षामध्ये कळंबोलीत नव्याने हॉस्पिटल सुरू करण्याची घोषणा महापालिका आयुक्त गणेश देशमुख यांनी केली होती.

कळंबोलीच्या समाज मंदिरामध्ये कोव्हिड हॉस्पिटलच्या जागेवर महापालिकेचे अत्याधुनिक रुग्णालय सुरू करण्याचा प्रस्ताव आहे. याबाबत त्वरित पावले उचलावीत तसेच वैद्यकीय सेवेची कळंबोलीकरांना गरज पाहता महानगरपालिकेचे हॉस्पिटल लवकरात लवकर सुरू करावे असे निवेदनात स्त्री अध्यक्ष विजया कदम यांनी म्हटले आहे.

## सण-उत्सवांच्या पार्श्वभूमीवर शांतता कमिटीची बैठक

**पनवेल : वार्ताहर**

समाजमाध्यमांवर प्रसारित होणारे बनावट संदेश, चित्रफीत यावर नियंत्रण ठेवावे, तरुणाईमध्ये जनजागृती करण्यासाठी शाळांमध्ये बैठका घ्याव्यात. तरुणपिढी अमली पदार्थांच्या सेवनाने उद्ध्वस्त होत आहे. त्यांना अमली पदार्थाच्या विळख्यातून सोडविणे अत्यंत गरजेचे आहे. पालक म्हणून आपली जबाबदारी समजून पोलीस प्रशासनाला समाजाच्या सहकार्याची आवश्यकता असल्याचे प्रतिपादन परिमंडळ २चे पोलीस उपायुक्त पंकज डहाणे यांनी केले.



आषाढी एकादशी, बकरी ईद व आगामी इतर सण-उत्सवांच्या पार्श्वभूमीवर कोणत्याही स्वरूपाचा कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये तसेच सामाजिक एकोपा अबाधित राहण्याच्या दृष्टीने परिमंडळ-२चे पोलीस उपायुक्त पंकज डहाणे यांच्या मार्गदर्शनाखाली पनवेलमध्ये शांतता कमिटी सदस्य, मोहल्ला कमिटी, सामाजिक व राजकीय लोकप्रतिनिधी आदींच्या बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. येत्या २९ जूनला एकाच दिवशी आषाढी एकादशी व बकरी ईद सण आला आहे. त्या पार्श्वभूमीवर पोलीस ठाणे स्तरावर शांतता कमिटी आणि मोहल्ला कमिटीच्या बैठका घेण्यात येत आहेत. या दरम्यान कोणत्याही अनुचित घटना घडल्यास त्याबाबत पोलिसांना तत्काळ माहिती द्यावी तसेच सोशल मीडियावर कोणताही आक्षेपार्ह अथवा समाजात तेढ निर्माण करणारा मजकूर आढळल्यास त्याबद्दलही पोलिसांना त्वरित माहिती द्यावी. कोणत्याही जाती-धर्माच्या भावना दुखावणाऱ्या आक्षेपार्ह पोस्ट्स, मेसेज, स्टेटस शेअर करू नयेत अशा सूचनाही यावेळी देण्यात आल्या. जेएनपीटी पोर्टचे सहाय्यक पोलीस आयुक्त धनाजी क्षीरसागर यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले, तर पनवेल शहर वरिष्ठ पोलीस निरीक्षक विजय कादबाने यांनी उपस्थितांचे आभार मानले. बैठकीला परिमंडळ-२ कार्यक्षेत्रातील सर्व पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक, शांतता समिती सदस्य, सामाजिक व राजकीय लोकप्रतिनिधी, सर्व जातीधर्मिय सदस्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

# मुसळधार पावसात, सिनेमाच्या थिएटरात!

**कधी पावसाची रिपरिप, कधी सोसायट्याचा उलटसुलट वारा, कधी जोराचा पाऊस, विजांचा कडकडाट, कधी ऐन पावसात छत्री सांभाळायची कसरत, कधी अक्षरश: बेभान-बेफाम मुसळधार पाऊस पडतोय, छत्री-रेनकोटही त्यापासून बचाव करू शकत नाहीत, भिजायला झालंय, पाणी तुंबलंय, त्यातून वाट काढणे अवघड झालंय आणि अशा ओलेत्या रूपात सिंगल स्क्रीन थिएटर्समध्ये जाऊन पिक्चर पाहिला जाई हा रिलिटी शो होता...**






## झूम प्रहर



**दिलीप ठाकूर**
चित्रपट समीक्षक

आजची मोबाईलवर-ओटीटीवर आपल्या वेळेनुसार पिक्चर एन्जॉय करणाऱ्या पिढीला हे सगळेच आश्चर्याचा धक्का देणारं, एवढं करून सिनेमा पहायला चित्रपटगृहात जायची काय गरज होती असा प्रश्न निर्माण करणारे आणि मग 'पिक्चरचं तुम्हाला इतकं काय वेड (येडं असाच उच्चार) होतं' असा खोचक प्रश्न करणारे आहे.

साठ, सत्तर, ऐंशीच्या दशकात असे भर पावसात घराबाहेर पडून थिएटरला जाऊन अनेक चित्रपट पाहिल्याच्या चित्रपट रसिकांच्या किमान दोन पिढ्यांच्या ओल्या आठवणी निश्चित आहेत व असतील. त्या काळात पिक्चर पाहण्यासाठीचे हुकमी माध्यम म्हणजे सिनेमाचे थिएटर. मग प्रचंड उन, कडाक्याची थंडी, धो धो पाऊस असं काहीही असू देत वा नसू देत. पर्यायच नव्हता हो. दिवसा तीन खेळ नवीन चित्रपट आणि सकाळी साडेअकराला मॅटीनीला जुने पिक्चर हा मेन्यू हुकमी होता, माईंड सेट पक्का होता. मेन थिएटरला मॅटीनीलाही नवीन चित्रपट येऊ लागले तेव्हा त्यात थोडा बदल होई, तर 'दूरदर्शन' आल्यावर शनिवारी संध्याकाळी जुना मराठी चित्रपट व रविवारी संध्याकाळी जुना हिंदी चित्रपट ब्लॅक अँड व्हाईट अर्थात कृष्ण धवल स्वरुपात पाहण्याचं कल्चर आले तरी थिएटरात जाण्याची गरज आणि सवय कायम होती. रंगीत टी. व्ही. आणि व्हिडीओचे आगमन होताच घरबसल्या चित्रपट पहायची सवय वाढली. तरी ऐन पावसाळ्यात छत्री सांभाळत थिएटरपर्यंत पोहचण्यात वेगळेच थ्रील होते...

जून, जुलै, ऑगस्ट, सप्टेंबर हे पावसाचे महिने आणि नेमक्या याच काळात भारी भारी पिक्चर्स रिलीज झालेत. नावच सांगताहेत, बाहेर पाऊस असला तरी काय झालं? पिक्चर पहायलाच हवा. अमर भूपाळी, मुगल-ए-आझम, हम दोनो, मधुमती, वक्त, संगम, फूल और पत्थर, तुमसे अच्छा कौन है, आया सावन झुम के, एक श्रीमान एक श्रीमती, अभिमान, बॉबी, हाथ की सफाई, शोले, प्रतिज्ञा, मिली, प्रियतमा, हम किसीसे कम नही, कुर्बानी, सिलसिला, गुलामी, मोहरा, सागर, राम तेरी गंगा मैली, त्रिदेव, हीना, हम आपके है कौन, १९४२अ लव्ह स्टोरी, रंगिला, बेताब, बॉर्डर, दिल, घायल, हम दिल दे चुके सनम, ताल, लगान, गदर एक प्रेमकथा, दिल चाहता है, सत्या, दिल है की मानता नही, आशिकी वगैरे वगैरे. अर्थात याच पावसात रिलीज झालेले एक महल हो सपनों का, जलमहल, बगावत, जीवन एक संघर्ष, खेल, बेखुदी, फूल, तुफान, जादूगर, जमाना दीवाना असे काही पिक्चर्स पडलेही. पब्लिक कौल दुसरं काय?

जून आला आला की शाळा-कॉलेज सुरू होताच कॉलेजमधील ग्रुप्स शेवटचं लेक्चर्स बुडवून मॅटीनी शोला हमखास जात. ती तर फॅशन होती. अशातच सणांची लाट येते व धार्मिक मूड निर्माण होतो (याच काळात पूर्वी हमखास पौराणिक चित्रपट प्रदर्शित होत आणि त्यालाही गर्दी होई. 'जय संतोषी मां' ३० मे १९७५ रोजी प्रदर्शित झाल्याचे टायमिंग अगदी परफेक्ट होते हे आजही त्याच्या खणखणीत यशाची 'शोले'शी तुलना होते यावरून चांगलेच सिद्ध होतेय). पूर्वी आजच्यापेक्षाही जास्त सणांच्या सुट्ट्या असत आणि सुटीच्या दिवशी पिक्चर पाहणे ही रूळलेली संस्कृती होती. बरं, रोजच भारी पाऊस असतो असे नव्हे. या काळात वातावरणात गारवा चांगलाच असतो. पिक्चर एन्जॉय करायला अतिशय सकारात्मक मूड. आषाढ, श्रावणात कधी छान उन पडलंय म्हणून सिनेमाला जावे तर तो संपून बाहेर पडावे तर जोरदार पाऊस आणि नेमकी हाती छत्री नाही असा प्रकार. मग कसा तरी आडोसा शोधा.






मी दक्षिण मुंबईतील गिरगाव लहानपणापासून पाहत आलो. मनसोक्त मनमुराद पाऊस पडल्यावर अलंकार, मोती, ड्रीमलॅन्ड, अप्सरा, मिनर्व्हा थिएटरबाहेर फारच पाणी तुंबे आणि त्यातून शोची वेळ गाठणे अवघड होई. अतिशय उत्साही प्रेक्षक त्या पाण्यातून भिजत, मार्ग काढत जाईदेखिल आणि मग हा अनुभव रंगवून खुलवून सांगे. अनेक जण अशा वेळी चार दिवसांपूर्वीच काढलेलं आपलं ॲडव्हान्स बुकिंगचे तिकीट वाया घालवत. अचानक एके दिवशी पाऊस आला आणि थिएटरवर गर्दी होईनासे वाटले तर ब्लॅक मार्केटमध्ये भाव एकदमच उतरे. अगदी मुद्दलच्या भावातही मी तिकीट घेतलयं. त्या काळात माझ्यासारख्या अनेक फिल्म दीवाने अशा अनेक छोट्या तरी हुकमी गोष्टी फॉलो करत असू. मुसळधार पाऊस थिएटर डेकोरेशनवर कधी परिणाम करे. कुठे त्याचा एकादा भागच उडून जायचा. मग नव्याने ते लागायचे.

काही खूपच जुन्या सिंगल स्क्रीन थिएटर्समध्ये थोडसं गळे, बाहेरच्या पावसाचा आत फार आवाज येई, पण ते विघ्न वाटत नसे. ग्रामीण भागात अनेक ठिकाणी या पावसाळ्यात थिएटर बंद असत, कारण सतत दिवे जाण्याची भीती होती. ओपन एअर थिएटर या काळात जणू गुंडाळून ठेवली जात. चित्रपट म्हणजे किती प्रकारच्या लहान लहान गोष्टी असतात बघा. म्हणूनच मी नेहमीच म्हणतो, लोकल चित्रपट संस्कृती जगावेगळी आहे. मिनर्व्हातील 'शोले'ने पाच पावसाळे पाहिले (तीन वर्षे नियमित तीन खेळ आणि नंतरची दोन वर्षे मॅटीनी शोची). कितीही पाऊस असला तरी 'शोले'साठी मिनर्व्हा गाठले जाई. ते दिवसच वेगळे होते.

ऐन वेळेस येणारा पाऊस गणेशोत्सवातील गल्ली चित्रपटात एक दोन रात्री हमखास हजेरी लावे. त्यात मंडपाखाली बसलेल्याला जणू कवच मिळे. पडद्याच्या उलट्या दिशेला बसणारे आडोसा शोधत, पण नजर पडल्यावर असे. कुठे पडदाही कमी जास्त भिजे. अगदी एका बाजूने अंगावर पाऊस पडत असला तरी त्यांचा पिक्चरमधला रस अजिबात कमी होत नसे. काहीजण छत्रीखाली उभे राहून पिक्चर बघत. किती ओलावा होता बघा. याच वेडाने आपल्या देशात चित्रपट रुजवला, वाढवला, पसरवला. उन, पाऊस, थंडीची पर्वा न करता अशी चित्रपट संस्कृती जगली.

मल्टीप्लेक्स युगात हे सगळचं मागे मागे पडत गेले. मल्टीप्लेक्सला स्वतःच्या गाडीने चित्रपट पहायला जाणारे खूप. त्यांना छत्री, रेनकोटची काय गरज? कधी काळी मात्र त्या लहान मोठ्या छत्र्यांनी (त्या काळात दांड्याच्या छत्र्या जास्त असत.) साथ दिली आणि चित्रपट एन्जॉय केले गेले. चिंब अनुभव घेतला...तेच तेच महत्त्वाचे आहे.

# उद्योजकांकरिता विविध कर्ज योजना

**कुठल्याही योजनेचे यश हे लोकाभिमुखता, पारदर्शकता व सुलभ कार्यप्रणालीवर अवलंबून असते. सर्वसामान्यांची कामे सुलभरित्या व स्थानिक पातळीवर होणे आवश्यक असते. शासन प्रत्येक क्षेत्रात विकासाच्या अनेक योजना राबवित असते. गरजूंसाठी तो आधार तर असतोच त्याचप्रमाणे, सामूहिक विकास प्रक्रियेलाही त्यातून गती मिळत असते. हे लक्षात घेऊन नागरिकांना विविध योजनांचे थेट लाभ मिळावेत, यासाठी शासनाने शासन आपल्या दारी..! हा एक महत्वाकांक्षी विशेष उपक्रम हाती घेतला आहे. या उपक्रमांतर्गत विविध शासकीय योजनांची जिल्हा माहिती कार्यालयामार्फत प्रसिध्दी करण्यात येत असून काय आहेत शासकीय योजना.. जाणून घेऊया या लेखातून...**

राज्यातील विमुक्त जाती, भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्गातील समाजातील दुर्बल घटकांच्या सर्वांगीण कल्याणासाठी शासनाने या महामंडळाची स्थापना केली आहे. समाजातील विमुक्त जाती, भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्गाच्या आर्थिक उन्नतीसाठी महामंडळामार्फत स्वयंरोजगाराच्या विविध कर्ज योजना राबविण्यात येतात. छोटे व्यावसायिक व स्वयंरोजगाराकरीता रु. १.०० लक्ष ची थेट कर्ज योजना (नियमित परतफेड करणाऱ्या लाभार्थींना व्याज नाही) व २५ टक्के बीज भांडवल योजना तसेच ऑनलाईन योजनांमध्ये वैयक्तिक कर्ज व्याज परतावा योजना (रु. १० लक्ष पर्यंत), गट कर्ज व्याज परतावा योजना (रु. १० लक्ष ते ५० लक्ष पर्यंत) या योजनांचा समावेश आहे. सन २०२२-२३ या वित्तीय वर्षाकरीता विविध कर्ज योजनांचे रायगड जिल्हा कार्यालयास उद्दिष्ट प्राप्त झाले आहे. थेट कर्ज योजना व २५ टक्के बीज भांडवल योजना या योजनाचे अर्ज जिल्हा कार्यालयात सशुल्क उपलब्ध आहेत.

रु. १.०० लक्ष थेट कर्ज योजना : लाभार्थींना हे कर्ज महामंडळातर्फे दिले जाते. कर्ज परत फेडीचा कालावधी ४ वर्ष आहे. अर्जदाराचे वयाची मर्यादा १८ ते ५५ वर्षे आहे. कर्जाची नियमित परतफेड करणाऱ्या लाभार्थींना व्याज आकारण्यात येणार नाही. मासिक हप्ता आहे रु. २०८५.

**२५ टक्के बीज भांडवल योजना :-** कर्जाची उच्चतम मर्यादा रु. ५ लक्ष पर्यंत. कर्ज परत फेडीचा कालावधी ५ वर्षे आहे. अर्जदाराचे वयाची मर्यादा १८ ते ५० वर्ष आहे. बँकेमार्फत लाभार्थींना ७५ टक्के कर्ज उपलब्ध केले जाते. यामध्ये महामंडळाचा सहभाग २५ टक्के, बँकेचा सहभाग ७५ टक्के महामंडळाच्या रक्कमेवर व्याजाचा दर ४ टक्के असतो.

**या योजनांसाठी लागणारी सर्वसाधारण कागदपत्रे :-** पासपोर्ट साईज २ फोटो, तहसिलदार/नायब तहसिलदार यांनी दिलेला उत्पन्नाचा मूळ (ग्रामीण व शहरी भागासाठी कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न १ लक्ष), सक्षम अधिकाऱ्याने दिलेले जातीचे प्रमाणपत्र (विजाभज व वि.म.प्र), दरपत्रक (कोटेशन), प्रकल्प अहवाल, आधारकार्ड, पॅनकार्ड किंवा निवडणूक ओळखपत्र व शिधापत्रिकेची झेरॉक्स, स्थानिक स्वराज्य संस्थेचे (ग्रामपंचायत/नगरपालिका) व्यवसाय करण्याबाबतचे ना हरकत प्रमाणपत्र, डोमिसाईल, रहिवासी दाखला, आधारकार्ड लिंक केलेल्या पासबुकची झेरॉक्स, वयाच्या पुराव्यासाठी शैक्षणिक अर्हतेचे प्रमाणपत्र/जन्मतारखेचा दाखला, भाडेकरार किंवा संबंधित जागामालकाचे संमतीपत्र व व्यवसायाच्या जागेचा असेसमेंट उतारा इ. कागदपत्रे लागतात.

वैयक्तिक कर्ज व्याज परतावा योजना व गट कर्ज व्याज परतावा योजना या योजनांकरीता महामंडळाच्या www.vjnt.in या संकेतस्थळाला भेट देवून ऑनलाईन अर्ज दाखल करता येईल.

**वैयक्तिक कर्ज व्याज परतावा योजना (रु. १० लक्ष पर्यंत) :-** ही योजना संपूर्णपणे संगणीकृत आहे. या योजनेमध्ये बँकेने रु. १० लाखापर्यंतच्या मर्यादित कर्ज मंजूर केलेल्या अर्जदाराने कर्जाचे हप्ते नियमित भरल्यानंतर व्याजाची रक्कम (१२ टक्के मर्यादित) अर्जदाराच्या आधार लिंक बँक खात्यात दरमहा महामंडळामार्फत जमा करण्यात येते. या योजनेचा कालावधी ५ वर्ष असेल. या योजनेसाठी अर्जदाराचे वय १८ ते ५० असावे, अर्जदाराचे कौटुंबिक वार्षिक उत्पन्न मर्यादा रु. ८ लक्ष पर्यंत (सक्षम प्राधिकरणाने वेळोवेळी दिलेल्या प्रमाणानुसार), कुटूंबातील एकाच व्यक्तीला या योजनेचा लाभ घेता येईल. अर्जदाराचे आधार संलग्न बँक खाते असणे अनिवार्य महामंडळाच्या www.vint.inš (व्याज परतावा योजना पर्याय) या वेबपोर्टलद्वारे ऑनलाईन पध्दतीने कर्ज अर्ज भरणे आवश्यक आहे. महामंडळाच्या अटी व शतीनुसार संगणीकृत सशर्त हेतुपत्र (Letter of Intent) दिले जाईल. अर्जदारास या आधारे बँकेकडून कर्ज मंजूर प्यावे लागेल.




**गट कर्ज व्याज परतावा योजना (रु.१० लक्ष ते ५० लक्ष पर्यंत) :-** विमुक्त जाती, भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्गातील महामंडळाच्या निकषांनुसार विहीत केलेल्या वार्षिक उत्पन्न मर्यादेतील उमेदवारांच्या बचत गट, भागीदारी संस्था, सहकारी संस्था, कंपनी (कंपनी अधिनियम २०१३ अंतर्गत), LLP, FPO अशा शासन प्रमाणिकरण प्राप्त संस्थाना बँकेमार्फत स्वयंरोजगार उद्योग उभारणीकरीता जे कर्ज दिले जाईल, त्या कर्ज रक्कमेवरील व्याज परतावा हा बँक प्रमाणीकरणानुसार महामंडळाकडुन अदा केला जाईल.

कौटुंबिक वार्षिक उत्पन्न मर्यादा रु. ८ लक्षपर्यंत असलेल्या उमेदवारांच्या गटास बँकेकडून रु. १० लक्ष ते रु. ५० लक्षपर्यंत मंजूर उद्योग उभारणीकरीता कर्ज उपलब्ध केले जाईल. गटातील सदस्यांचे वय १८ ते ४५ पर्यंत असावे. गटातील सर्व सदस्यांचा सिबिल क्रेडीट स्कोअर किमान ५०० इतका असावा. परतफेडीचा कालावधी- मंजूर कर्जावर ५ वर्षापर्यंत अथवा कालावधी यापैकी जो कमी असेल तो. कर्ज मंजूर केलेल्या गटाने वेळेत कर्जाचे हप्ते भरल्यास, हप्ता भरल्यावर (जास्तीत जास्त १२ टक्के व्याजदराच्या आणि रु.१५ लाखाच्या मर्यादेत) त्यातील व्याजाची रक्कम त्यांच्या आधार लिंक बँक खात्यात दरमहा महामंडळामार्फत जमा करण्यात येईल. महामंडळाच्या www.vjnt.in (व्याज परतावा योजना पर्याय) या वेबपोर्टलद्वारे गटाचा ऑनलाईन पध्दतीन कर्ज अर्ज भरणे आवश्यक आहे. महामंडळाच्या अटी व शर्तीनुसार संगणीकृत सशर्त हेतुपत्र (Letter of Intent) दिले जाईल. गटास या आधारे बँकेकडून कर्ज मंजूर करून घ्यावे लागेल.

इच्छुक, गरजू विजभज व विमप्र प्रवर्गातील व्यक्तींनी योजनेच्या अधिक माहितीकरीता वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळ (मर्या), जिल्हा कार्यालय, श्री राम समर्थ गृहनिर्माण संस्था मर्या., सदनिका क्र. ०१, तळमजला, मारुती मंदिरामागे, चेंढरे अलिबाग, ता.अलिबाग, जि.रायगड, दूरध्वनी क्र. ०२१४१-२२१३०७, Email - vnvintdcraigadlomail.com येथे संपर्क साधावा. तसेच अधिक माहितीसाठी www.vjnt.in या संकेतस्थळाला भेट द्यावी, असे जिल्हा व्यवस्थापक निशिकांत नार्वेकर यांनी कळविले आहे.

**-मनोज शिवाजी सानप,**
**जिल्हा माहिती अधिकारी,**
**रायगड-अलिबाग**

# बाप समजून घेताना...

'बाप समजून घेण्यासाठी आधी बाप व्हावं लागतं' हे माझ्या वडिलांचे शब्द मला वेळोवेळी वडिलांच्या कष्टाची, त्यागाची, समर्पणाची जाणीव करून देत असतात. खरंतर प्रत्येकाच्या आयुष्यात वडिलांचे स्थान नक्कीच वेगवेगळे असू शकते, परंतु ज्या वेळी एक वडील म्हणून त्यांना आपण समजून घेऊ तेव्हा वडिलांबद्दल सर्वांचे विचार सारखे असतील या दुमत नाही. जागतिक पितृदिनानिमित्त या भावना...

आज कितीतरी कुटुंबात असे दिसून येते की वडील आणि मुलांमध्ये नेहमीच शीतयुद्ध सुरू असतश. ते कधी महायुद्धात जाते हे कळतसुद्धा नाही. त्यामुळे आज कितीतरी मुलं असे आहेत की जे आई-वडिलांच्या त्यागामुळे यशस्वी झाले आणि त्याच आई-वडिलांना विसरून त्यांच्यापासून दूर झाले आहेत. सांगायचं तात्पर्य एवढचं की वडिलांना समजून घेणारे खूप कमी आहेत. म्हणूनच की काय आज वृद्धाश्रमात जाणाऱ्यांची संख्या वाढत आहे.

वडील काय असतात हे त्याला विचारा ज्याने लहानपणीच स्वतःच्या वडिलांना गमावून पोरका झाला असेल. बापाविषयी त्याच्याशिवाय कुणी सांगू शकत नाही की बाप नेमका काय असतो? कारण आयुष्याच्या प्रवासात ज्या ज्या वेळी बापाची उणीव भासते तेव्हा तेव्हा नक्कीच त्याच्या डोळ्यांत पाणी येते आणि वाटतं बाप असता तर? पण हे दुःख तो कधी व्यक्त करू शकत नाही, कारण बाप नावाची सावली त्याच्यापासून दूर झालेली असते.

वडील कधीच आपल्या मुलांबद्दल चुकीचा विचार करत नाही. ते नेहमी मुलांची काळजी करत असतात. मुलांच्या प्रत्येक सुखदुःखात सोबत असतात, पण आजकालची दोन वर्ग जास्त शिकलेली पोर वडिलांना म्हणतात तुम्हाला काय समजतं? आम्ही मॉर्डन जमान्यातले आहोत. आम्हाला कळत काय योग्य अन् काय चुकीचे आहे. त्यामुळे वडिलांच्या भावना समजून घेण्यासाठी आजचे पोर कमी पडत आहेत की काय यावर चिंतन आणि मनन करणे गरजेचे आहे.

वडिलांबद्दल उलट-सुलट बोलणं खूप सोपे आहे, परंतु कुटुंबाची जबाबदारी, मुलांच्या भविष्याची चिंता, मुलांमुलींचे लग्न, आरोग्य-शिक्षण या सर्वाचा ज्यावेळी विचार करू तेव्हा खऱ्या अर्थाने बाप समजून घेता येईल, कारण वडिलांनाच माहिती असते की या सर्वांसाठी काय करावे लागते आणि काय गमवावे लागते. म्हणून बाप समजून घेणं इतकही सोपं नाही, कारण प्रत्येकाला इथे बापसुद्धा होता येत नाही.

मुलांच्या सवयी, इच्छा पूर्ण करण्यासाठी कधी-कधी वडिलांची ऐपत नसते तेव्हा वडील स्वतःच्या सवयी आणि इच्छा तोडून टाकतात, पण मुलांच्या इच्छा पूर्ण करण्यासाठी तयार असतात, परंतु त्यांच्या त्यागाची जाणीवसुद्धा आजकालच्या पोरांना नसते आणि ते पोरही म्हणून जातात 'सगळेच वडील करतात तुम्ही काय आमच्यासाठी वेगळं करत नाही'... हे सगळं ज्या वेळी वडिलांच्या कानावर पडते तेव्हा मनातून जे दुःख होते ते वडील कधीच कुटुंबासमोर व्यक्त करत नाही, कारण त्याचा परिणाम आपल्या मुलांवर होऊ नये म्हणूनच.

शेवटी सांगणे एवढेच की, जोपर्यंत वडील आहे तोपर्यंत त्यांना समजून घ्या. त्यांच्या मार्गदर्शनाखाली स्वतःला घडवा. खूप मोठे व्हा, पण कधी वडिलांना विसरू नका, कारण ज्या वेळी दिशा दाखविणारा नसतो ना तेव्हा आयुष्याची दशा झाल्याशिवाय राहत नाही आणि ज्या वेळी आपल्या आयुष्यातून बाप नावाची भिंत कोसळते ना तेव्हा तिथून सावरायला खूप काळ निघून जातो. अनेक मार्ग आपोआप बंद होऊन जातात आणि अगदी आयुष्यही अपुरं पडत बाप समजून घेताना...

**-सुरज पी. दहागावकर, चंद्रपूर**



**बाप...**

**तो हसतो पण रडत नाही,**
**तो खचतो पण वाकत नाही**
**कारण बाप नावाची भिंत,**
**सहजासहजी कोसळत नाही**
**तो चिंता कधी दाखवत नाही,**
**तक्रार कधी करत नाही**
**बाप नावाचा माणूस कधी,**
**जबाबदारीतुन मुक्त होत नाही**
**त्याच्या शिव्या दिसतात माया नाही,**
**राग दिसतो प्रेम नाही**
**पण न दाखवता प्रेम करणारा,**
**त्याच्यासारखा जगात नाही**
**त्याच्यावर लिहले जात नाही,**
**म्हणून तो कमी होत नाही**
**त्याच्यासारखा त्याग करणारा,**
**कुणी होऊ शकत नाही**
**तो असताना कळत नाही,**
**सहजासहजी समजत नाही**
**त्याला समजण्यासाठी,**
**प्रत्येकालाच बाप होता येत नाही**
**तो पुस्तकात राहत नाही,**
**कुणाच्या मस्तकात दिसत नाही**
**कारण मुलांना घडणारा हा कुंभार,**
**शब्दांमध्ये मावत नाही**

# स्वच्छता कार्यात दिरंगाई केल्यास कारवाई

## आयुक्त राजेश नार्वेकर यांचा अधिकाऱ्यांना इशारा

**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबई ही स्वच्छ सर्वेक्षणामध्ये सातत्याने मानांकन उंचाविणारे शहर असून या गौरवामुळे राज्याचाही गौरव वाढतो. हे लक्षात घेऊन आतापासूनच स्वच्छ सर्वेक्षणाशी संबंधित प्रत्येक घटकाने हे आपले काम आहे या भावनेतून काम करावे असे निर्देश देत आयुक्त राजेश नार्वेकर यांनी याकामी कोणतीही हयगय खपवून घेतली जाणार नाही व कामात हलगर्जीपणा आढळल्यास कारवाई केली जाईल असा इशारा स्वच्छ सर्वेक्षणविषयक आढावा बैठकीत दिला.

स्वच्छ सर्वेक्षण २०२२मध्ये नवी मुंबई महानगरपालिका देशात तिसरी व राज्यात पहिली मानांकन संपादन करून या वर्षीच्या स्वच्छ सर्वेक्षण २०२३ला सामोरे जाताना देशातील पहिल्या क्रमांकाच्या स्वच्छ शहराचे उद्दिष्ट नजरेसमोर ठेवून वाटचाल करीत आहे. त्या अनुषंगाने शहर स्वच्छतेकडे अधिक बारकाईने व काटेकोरपणे लक्ष देण्याची गरज आयुक्तांनी व्यक्त केली. याकरिता सर्वेक्षणाशी संबंधीत सर्व बाबींवर क्षेत्रीय स्तरावरील अधिकारी, कर्मचारी यांनी दररोज नियमितपणे लक्ष ठेवावे व कोणताही बाब नजरेतून सुटणार नाही याची काळजी घेण्याचे स्पष्ट केले. आपण करीत असलेल्या कामावर समाधानी न राहता त्यामध्ये अधिक चांगला बदल घडविण्याचा दृष्टीकोन जपण्याच्या सूचना आयुक्तांनी दिल्या. क्षेत्रीय पातळीवर स्वच्छता विभाग, अभियांत्रिकी विभाग, उद्यान विभाग तसेच इतर विभागाच्या अधिकारी, कर्मचाऱ्यांनी समन्वय राखावा आणि हे काम आपल्या विभागाचे नाही असे न म्हणता हे आपल्या सर्वांचे काम आहे हे लक्षात घेऊन परस्पर सहकार्याने काम करावे असेही आयुक्तांनी सूचित केले.

कचरा वर्गीकरण, घराघरात कपोस्ट बास्केटद्वारे लावली जाणारी ओल्या कचऱ्याची विल्हेवाट, सोसायट्या, मोठ्या संस्था अशा मोठ्या प्रमाणात कचरा निर्माण होणाऱ्या ठिकाणी घनकचरा प्रकल्प राबविणे अशा विविध बाबींकडे अधिक बारकाईने लक्ष देण्याचे सूचित करतानाच आपल्या शहरातील स्वच्छतेविषयी नागरिकांच्या मनातील प्रतिमा उंचाविण्याच्या दृष्टीने नागरिकांसोबत संवाद वाढविण्याचीही गरज असल्याचे आयुक्त राजेश नार्वेकर यांनी सांगितले.

घनकचरा व्यवस्थापन विभागाचे उपआयुक्त डॉ. बाबासाहेब राजळे यांनी सादरीकरणाद्वारे स्वच्छ सर्वेक्षण परीक्षणाच्या अनुषंगाने विविध बाबींविषयी सविस्तर माहिती दिली. याप्रसंगी अतिरिक्त आयुक्त संजय काकडे, शहर अभियंता संजय देसाई तसेच इतर विभागप्रमुख, विभाग अधिकारी, कार्यकारी अभियंता, स्वच्छता अधिकारी तसेच संबंधित विभागातील अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

### नागरिकांच्या सूचना गांभिर्याने घ्या!

**नागरिकांनी दाखविलेल्या त्रुटींबाबत तत्पर कार्यवाही करण्यासोबतच नागरिकांनी त्रुटी दाखविण्यापूर्वी त्या आपल्या नजरेस आल्या पाहिजेत अशी दृष्टी ठेवून क्षेत्रीय स्तरावर फिरावे असेही आयुक्तांनी अधिकारी, कर्मचाऱ्यांना निर्देशित केले.**

# २१ गुन्हे दाखल असणाऱ्या सराईत गुन्हेगारास अटक

## सव्वाचार लाखांचा मुद्देमाल हस्तगत; साथीदाराचा शोध सुरू



**पनवेल : वार्ताहर**

ठाणे जिल्ह्यातील विविध पोलीस ठाण्यांमध्ये तब्बल २१ गुन्हे दाखल असलेल्या सराईत सोनसाखळी, मोबाईल जबरी चोरी, दुचाकी चोरी करणाऱ्या आरोपीस मानपाडा पोलिसांनी अटक केली आहे. त्याच्याकडून ६० ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिने, आठ दुचाकी, पाच मोबाईल फोन असा एकूण चार लाख २५ हजार रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. त्याच्या साथीदाराचा शोध मानपाडा पोलीस घेत आहेत.

डोंबिवली परिसरात राहणारे शरद कडुकर हे पायी चालत जात असताना अज्ञात चोरट्याने मागून येऊन त्यांचे हातातील मोबाईल फोन चोरून नेला होता. याबाबतची तक्रार मानपाडा पोलीस ठाण्यात दाखल झाल्यानंतर पोलीस निरीक्षक सुरेश मदने यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे प्रकटीकरण पथकाने गुप्त बातमीदार तसेच आरोपीच्या वर्णनानुसार शोध घेत असताना आरोपी कल्याण शहाड भागात येणार असल्याची माहिती मिळविली.

त्यानुसार आरोपी मुस्तफा उर्फ मुस्सु जाफर सैयद उर्फ इराणी (वय २४, रा. अंबिवली) हा दुचाकी घेण्यासाठी शहाड रेल्वेस्टेशन परिसरात आला असता त्याला ताब्यात घेऊन चौकशी केली असता त्यांने गुन्ह्यांची कबुली दिली. आरोपीकडून ६० ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिने, आठ दुचाकी, पाच मोबाईल फोन असा एकूण चार लाख २५ हजार रुपये किमतीचा मुद्देमाल मानपाडा पोलिसांनी जप्त केले असून त्याच्या साथीदाराचा शोध सुरू आहे.

## निवडक

### सानपाडा विद्यालयात विद्यार्थी गुणगौरव



**नवी मुंबई** : माध्यमिक विद्यालय सानपाडा येथे गुरुवारी (दि. १५)शाळा प्रवेशोत्सव व माध्यमिक शालांत परीक्षेतील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार समारंभ आयोजित केला होता. या सत्कार सोहळ्याला प्रमुख अतिथी म्हणून भाजप नवी मुंबई युवा उपाध्यक्ष पांडुरंग आमले, टीजेएसबी बँकेचे असिस्टंट मॅनेजर वाघमारे उपस्थित होते. या वेळी इ. आठवीच्या विद्यार्थ्यांना सर्व शिक्षा अभियानांतर्गत मोफत पाठ्यपुस्तके प्रमुख मान्यवरांच्या हस्ते देण्यात आली.

### शिवसेना सदस्य नोंदणी शिबिर



**नवी मुंबई :** वाशी येथील नाका कामगार नाक्यावर शिवसेना सदस्य नोंदणी सुरू करण्यात आली. शिवसेना-कामगार सेना नवी मुंबई प्रमुख प्रदीप वाघमारे उपस्थित होते. या वेळी शिवसेना सदस्य नोंदणीसाठी वाशी नाका येथील कामगार मोठ्या संख्येने उपस्थित होते. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे महाराष्ट्रातील जनतेसाठी करीत असलेल्या कामांविषयी व योजनांविषयी माहिती कामगार नेते प्रदिप वाघमारे यांनी दिले.

### भाजपकडून विद्यार्थ्यांचा सत्कार



**नवी मुंबई** : भाजप नेरूळ विभागाच्या वतीने यंदाच्या वर्षी दहावी आणि बारावीच्या परीक्षेतील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार माजी नगरसेवक सूरज पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली प्रभाग क्रमांक ३४मधील नेरुळ सेक्टर १०, सेक्टर ८, कूकशेत, सारसोळे गाव तसेच सेक्टर ६मधील विद्यार्थ्यांच्या घरोघरी जाऊन सत्कार केला. माजी नगरसेविका सुजाता पाटील, जयश्री ठाकूर आणि भाजप शिष्टमंडळाने गुणवंत विद्यार्थी यांच्या घरोघरी जाऊन पुढील नेत्रदीपक यश मिळविण्यासाठी प्रोत्साहित केले.

# नवी मुंबईतील १४ पोलीस अधिकाऱ्यांच्या बदल्या

**पनवेल : वार्ताहर**

महाराष्ट्र पोलीस दलामध्ये ४५०वरिष्ठ पोलीस निरीक्षकांच्या बदल्या करण्यात आल्या आहेत. त्यामध्ये नवी मुंबईतील १४ अधिकाऱ्यांचा समावेश आहे. स्मिता जाधव, विजय कादबाने, संदिपान शिंदे, अर्जुन गरड यांचा कार्यकाळ संपल्याने त्यांना गृह विभागाने ठाणे शहरात काम करण्याची संधी दिली आहे, तर शत्रुघ्न माळी यांची रायगडला बदली करण्यात आले आहे.

गृह विभागाने कार्यकाळ पूर्ण झालेल्या आणि विनंती बदल्यांचे आदेश शुक्रवारी निर्गमित केले. नवी मुंबई पोलीस दलात सहा वर्ष पूर्ण झालेल्या १४ अधिकाऱ्यांची बदली झाली आहे. पनवेल शहर पोलीस ठाण्याच्या वरिष्ठ पोलीस निरीक्षक विजय कादबाने, उरण पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी संदिपान शिंदे आणि लेडी सिंघम पोलीस ऑफिसर स्मिता जाधव यांचा समावेश आहे. गुन्हे अन्वेषणाचे आणि प्रगटीकरण यामध्ये हातखंडा असणाऱ्या कादबाने आणि शिंदे यांनी नवी मुंबईमध्ये अतिशय उत्कृष्ट कामगिरी केली. नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळामध्ये येणारे अडथळे दूर करण्यासाठी वरिष्ठ पोलीस निरीक्षक म्हणून विजय कादबाने यांनी सोशल पोलिसिंगच्या माध्यमातून अतिशय उजवे काम केले. कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ दिला नाही. त्यांच्या कामाचे सिडको प्रशासनाने ही कौतुक केले. त्याचप्रमाणे संदिपान शिंदे यांनीसुद्धा खारघर आणि उरण पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी म्हणून छाप पडली.

कामोठे पोलीस ठाण्याच्या वरिष्ठ पोलीस निरीक्षक या पदाला स्मिता जाधव यांनी न्याय दिला. त्याचबरोबर गुन्हे शाखेत काम करत असताना अर्जुन गरड यांनीही आपल्या कार्यक्षमतेचा प्रत्यय नवी मुंबईकरांना दिला. शत्रुघ्न माळींनीसुद्धा नवी मुंबईत प्रभावी काम केले. त्यांच्याबरोबरच नितीन गीते, वाहन चालकांना शिस्त लावणारे निशिकांत विश्वकर, भारत कामत, बापूराव देशमुख, राजू सोनवणे, विजय वाघमारे, दत्तात्रय शिंदे, प्रमोद पवार या वरिष्ठ पोलीस निरीक्षकांनीही आपली कर्तव्य दक्षता दाखवून दिली. भागुजी औटी यांना शासनाने मुदतवाढ दिली आहे.

घनश्याम आढाव यांनी आतापर्यंत काम केले आहे. पोलीस उपनिरीक्षक म्हणून त्यांनी केलेली कामगिरी आजही पनवेलकरांच्या स्मरणात आहे. ठाणे ग्रामीण मध्येही त्यांनी आपल्या कार्य कुशलतेचा ठसा उमटवला. वरिष्ठ पोलीस निरीक्षक म्हणून घनश्याम आढाव यांना काम करण्याची संधी राज्य सरकारने दिली आहे. त्याचबरोबर औदुंबर पाटील या कार्यक्षम अधिकाऱ्याची ही नवी मुंबईत बदली करण्यात आली आहे. या व्यतिरिक्त प्रकाश सपकाळ, संजय बेंडे, प्रवीण भगत, राजकुमार कोथिंबीर, बापू ओवे, नितीन ठाकरे, गुलफरोज मुजावर, जितेंद्र मिसाळ, संजय पाटील, सुरज पाटील आबासाहेब पाटील यांचीसुद्धा नवी मुंबई पोलीस दलात नियुक्ती करण्यात आली आहे.

### नेरूळमध्ये आज करिअर मार्गदर्शन शिबिर

**नवी मुंबई** : स्वराज्य संघटना, नवी मुंबईच्या वतीने दहावी, बारावी आणि पदवीनंतर पुढे काय याबाबत करिअर मार्गदर्शन शिबिराचे आयोजन रविवारी (दि. १८) सकाळी १०.३० ते १२.३० दरम्यान करण्यात आले असल्याचे नवी मुंबई उपाध्यक्ष स्वप्नील घोलप यांनी कळविले आहे. या वेळी प्रो. डॉ. सत्यवान हाणेगावे यांचे उपस्थित विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणार आहेत. नेरूळ सेक्टर १८ येथील स्व. बाळासाहेब ठाकरे सभागृहात विद्यार्थ्यांनी उपस्थित रहावे, असे आवाहन स्वप्निल घोलप यांनी केले आहे.

# महिलांसाठी ब्युटिशियनचा मोफत कोर्स



**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबई महापालिका आणि भाजपच्या स्थानिक नगरसेविका रूपाली भगत यांच्या संयुक्त विद्यमाने विभागिय जनतेसाठी मोफत कोर्स उपलब्ध करून देण्यात आले आहे.


या कोर्सेसमध्ये सहभागी होऊन स्वबळावर उभे राहून व्यवसाय करून आपले आर्थिक उत्पन्न वाढवावे या हेतूने माजी नगरसेविका रूपाली भगत यांनी पुढाकार घेत महापालिकेच्या माध्यमातून नेरूळ सेक्टर १६मधील जनसंपर्क कार्यालयात ब्युटिशियन कोर्स महिलांसाठी उपलब्ध करून दिला आहे. या ब्युटिशियन कोर्सच्या दोन बॅचेस झाल्या असून ६० महिला आता व्यवसाय करण्यासाठी सज्ज झाल्या आहेत.

महापालिका प्रशासनाकडून महिलांनी, युवकांनी स्वबळावर उभे राहावे यासाठी वेगवेगळे तब्बल ३८ अभ्यासक्रम मोफत शिकविण्यात येत आहे. यंदाही ब्युटिशियन अभ्यासक्रमासाठी महिलांना सहभागी करून घेत महापालिका प्रशासनाच्या माध्यमातून दोब बॅचेस घेण्यात आल्या. या महिलांना अभ्यासक्रम शिकविण्यात आला. या महिलांना, मुलींना अभ्यासक्रमाचे प्रमाणपत्रही देण्यात आले आहे. या अभ्यासक्रमात सहभागी होण्यासाठी आधार कार्ड, जातीचे प्रमाणपत्र, शाळा सोडल्याचा दाखला, तीन वर्षांचा रहिवासी दाखल या कागदपत्रांसह एक फोटोची आवश्यकता आहे.

नगरसेविका रूपाली भगत या पालिका प्रशासनाच्या माध्यमातून पुन्हा एकदा अभ्यासक्रम घेणार असून यासाठी नावनोंदणी करण्यासाठी इच्छूकांनी अशोक गांडाळ (८३६९१४७७९७) आणि सागर मोहिते (८३६९६४१९४६) संपर्क साधावा व विविद अभ्यासक्रमाविषयी माहिती जाणून घ्यावी, असे आवाहन माजी नगरसेविका रूपाली भगत यांनी केले आहे.


# श्री.स.स. बाळकृष्ण महाराज अध्यात्मिक ज्ञानमंदिर, शिवाजीनगर

वर्ष २० वे || ॐ श्री बाळकृष्णाय नमः || स्थापना २००३




श्री समर्थ सद्गुरु बाळकृष्ण महाराज (नंदेश्वर)



श्री समर्थ सद्गुरु भाऊसाहेब महाराज (नंदेश्वर)



स्वानंद सुखनिवासी संयोजक स्मृती (शि.नगर) पिताजी श्री. चांगू काना ठाकूर



स्वानंद सुखनिवासी संयोजक स्मृती (शि.नगर) माताजी श्रीमती भागूबाई चांगू ठाकूर



श्री समर्थ सद्गुरु दादामहाराज (मुंबई)

# पुण्यतिथी सोहळा

**आपणांस कळविण्यात येते की, आमचे वडिल स्वानंद सुख निवासी 'श्री. चांगू काना ठाकूर' यांची पुण्यतिथी मती आषाढ शु. ०३, शके १९४५, बुधवार दिनांक २१/०६/२०२३ रोजी सकाळी १०.०० वाजता श्री समर्थ दासबोध वाचन ग्रंथ श्री बाळकृष्ण महाराज यांचे चरित्रामृत ग्रंथाचे पारायण प्रारंभ, आषाढ शु. ०४, शके १९४५, गुरुवार दिनांक २२/०६/२०२३ रोजी दुपारी १२.०० वाजता पुण्यतिथी निमीत्ताने माऊलीवर पुष्पवृष्टी शिवाजीनगर येथे साजरी होणार आहे. तरी आपण सर्व नातेवाईक, गुरूबंधू भगिनींनी उपस्थित रहावे, ही विनंती.**

## ✻ कार्यक्रम ✻

| बुधवार, दिनांक २१/०६/२०२३ | |
|---|---|
| सकाळी ०९.०० ते १०.०० भजन | बाळकृष्ण महाराज संगीत भजन, न्हावाखाडी (उत्तरपाडा)<br>बुवा : गणपत ठाकूर, नितीन ठाकूर, श्री. रमण ठाकूर<br>पखवाज : गौरव म्हात्रे (गव्हाण) |
| सकाळी १०.०० ते १२.०० प्रवचन | श्री. स. स. बाळासाहेब महाराज (नंदेश्वर), श्री. भागवत साहेब, पुणे,<br>ह. भ. प. आप्पा पांचाळ महाराज (चिपळूण), ह. भ. प. रामनाथ महाराज (वहाळ),<br>श्री. रमण ठाकूर (न्हावाखाडी), श्री. अरुणशेठ ठाकूर |
| दुपारी ०२.०० ते ०३.०० भजन | श्री विश्वंभर भजन मंडळ, गव्हाण गायक : हेमंत कोळी,<br>रविराज कोळी आणि मंडळी |
| दुपारी ०३.०० ते ०५.०० भजन | भावभक्ती महीला मंडळ, गव्हाण - कोपर गायीका : श्रीमती. हिराबाई घरत,<br>सौ. आनंदी घरत, सौ. रत्नप्रभा घरत, सौ. चंद्रभागा घरत,<br>श्री गुरुकृपा महिला भजन मंडळ - कोपर गायीका : सौ. सुप्रिया घरत<br>वादक : तुषार घरत |
| सायं. ०५.०० ते ०६.०० भजन | संत जनाबाई भजन मंडळ, विहीघर गायीका : पुनम ठाकूर, रूपम वास्कर<br>श्री. हर्षल फडके (विहीघर) पखवाज : श्री. मधुकर डोंगरे |
| सायं. ०६.०० ते ०७.०० आरती | माऊलींची आरती |
| सायं. ०७.०० ते ०८.०० | ध्यान आणि पारायण वाचन |
| सायं. ०८.०० ते ०९.०० भजन | दत्त प्रासादिक भजन मंडळ, कोपर बुवा : श्री. वसंतशेठ पाटील (कोपर)<br>पखवाज : गौरव म्हात्रे (गव्हाण) |
| सायं. ०९.०० ते ११.०० किर्तन | ह. भ. प. पुरुपोत्तम महाराज घाटाव आणि मंडळी |
| रात्री ११ नंतर | रात्रीचे बारा अभंग, जागर (भजन-सार्वजनिक गुरूबंधू भगिनी) |

| गुरुवार, दिनांक २२/०६/२०२३ | |
|---|---|
| सकाळी ०८.०० ते १०.०० भजन | नादब्रम्हा भजन मंडळ (खारघर - रांजणपाडा) बुवा : श्री. निवृती बुवा चौधरी, वसंतशेठ पाटील (कोपर), ज्ञानेश्वर म्हात्रे (गव्हाण), गणपत ठाकूर (कोपर), भाऊ ठाकूर, सुरेश ठाकूर (शि. नगर), नितीन ठाकूर (त. पाडा), श्री. महेश पाटील (न्हावा),<br>पखवाज : गौरव म्हात्रे |
| सकाळी १०.०० ते १२.०० प्रवचन | श्री. स. स. बाळासाहेब महाराज (नंदेश्वर) |
| दुपारी १२.०० वाजता | श्री. माऊलीवर पुष्पवृष्टी |

### ✻ कार्यक्रमाचे ठिकाण ✻

श्री. स. स. बाळकृष्ण महाराज अध्यात्मिक ज्ञानमंदिर, शिवाजीनगर
मु. शिवाजीनगर, पो. गव्हाण,
ता. पनवेल, जि. रायगड.
फोन नं. ९१६७९९१०४५

### ✻ व्यवस्थापक ✻

देवसागर साधक समाज (इंचगिरी सांप्रदाय)
शिवाजीनगर- गव्हाण- न्हावेखाडी- कोपर (संचलित)

### ✻ संयोजक ✻

श्री. रामशेठ ठाकूर (माजी खासदार)
आणि परिवार, ग्रामस्थ मंडळ, शिवाजीनगर

# कल्पतरू-नांगुर्ले ग्रामस्थ वाद संपुष्टात

**कर्जत : प्रतिनिधी**

कल्पतरू कंपनी आणि नांगुर्ले ग्रामस्थ यांच्यामध्ये येथील स्थानिक युवकांना रोजगार आणि काम देण्यावरून वाद निर्माण झाला होता. त्याचे रूपांतर साखळी उपोषण व त्यानंतर आमरण उपोषण यामध्ये झाले, परंतु कंपनी व्यवस्थापनाने सकारात्मक भूमिका घेतल्याने दोघांमधील वाद मिटून ग्रामस्थांचे प्रश्न मार्गी लागणार हे स्पष्ट झाले. तरीही कंपनी आणि ग्रामस्थ यांच्यामध्ये वितुष्ट का आले याची शहानिशा करण्यासाठी आयोजित केलेल्या बैठकीत सविस्तर चर्चा होऊन शंका-कुशंका दूर होऊन दोघांमध्ये जे ठरले त्यावर शिक्कामोर्तब झाले.



(छाया : विजय मांडे)

कर्जत तालुक्यातील पळसदरी ग्रामपंचायत हद्दीत नांगुर्ले परिसरात कल्पतरू कंपनीचा बंगलो प्रकल्प सुमारे १२० एकर जमिनीवर उभा राहत आहे. अलीकडे बांधकाम व इतर कामे सुरू झालेली आहेत. या कामात ग्रामस्थ, शेतकरी, भूमिपुत्र यांना कल्पतरू कंपनीच्या अटी व शर्तीनुसार पार्टनर कंपनीच्या नावे कामाचे प्रत्यक्ष कार्यादेश मिळावेत या मागणीसाठी १६ मे २०२३ रोजी स्थानिक साखळी उपोषणास बसले होते. ग्रामस्थांनी उपस्थितांचा मान राखून साखळी उपोषण सोडले. त्याला पंधरा दिवस झाले. त्यामुळे ग्रामस्थांनी तहसील कार्यालयासमोर आमरण उपोषण सुरू केले होते. यामध्ये १४ महिलांचा समावेश होता. चौथ्या दिवशी कंपनी व्यवस्थापन सोमवारी १२ जून राजी ग्रामस्थांशी चर्चेला तयार असल्याचे तहसीलदारांनी सांगितल्याने ग्रामस्थांनी उपोषण स्थगित केले. ठरल्याप्रमाणे सोमवारी निवासी नायब तहसीलदार यांच्या उपस्थितीत बैठक झाली आणि कंपनी व्यवस्थापनाने सकारात्मक भूमिका घेतल्याने ग्रामस्थांचा प्रश्न सुटला, मात्र कंपनी आणि ग्रामस्थांमध्ये असे का घडले? तसेच कंपनीने दिलेले आश्वासन विश्वासार्ह असेल का? यासाठी आमदार महेंद्र थोरवे यांच्या उपस्थितीत बैठक घेण्याचे ठरले.

कर्जत येथील शिवसेना बाळासाहेब भवन येथे शनिवारी (दि. १७) सकाळी माजी उपसभापती मनोहर थोरवे यांच्या उपस्थितीत बैठक घेण्यात आली. या बैठकीस स्वराज्य संघटनेचे प्रदेश उपाध्यक्ष विनोद साबळे, अ‍ॅड. राजेंद्र निगुडकर, अ‍ॅड. कैलास मोरे, अ‍ॅड. प्रदीप सुर्वे, अ‍ॅड. साहिल निगुडकर, नांगुर्ले ग्रामस्थांचे प्रतिनिधी कैलास म्हामले आणि ग्रामस्थ उपस्थित होते, तर कंपनीच्या वतीने कल्पतरू कंपनीचे उपाध्यक्ष अमोल मथुरे, अनिल चोरगे, एरिना ऑर्चडस कंपनीचे किशोर जाधव, सुनील घाटे उपस्थित होते.

२२ मे रोजी बैठकीला येण्याचे मान्य करूनही कंपनीच्या कोणत्याही प्रतिनिधीने उपस्थित न राहून ग्रामस्थांना प्रतिसाद दिला नाही. त्या वेळी मनोहर थोरवे यांनी मध्यस्थी केली होती. त्यावर अमोल मथुरे यांनी तेव्हा माझ्याकडूनच काही कारणाने येणे शक्य झाले नव्हते. त्यात थोरवे यांची कोणतीही चूक नाही, असे स्पष्ट करून गावातील युवकांना काम देण्यास आम्ही तयार आहोत. ते कोणते कोणते काम करू शकतात? हे आम्हाला समजले पाहिजे तसेच एका कंपनीचे कागदपत्र आमच्याकडे देण्यात आले आहेत. अजून दोन-तीन कंपन्यांचे कागदपत्र लवकरात लवकर दिल्यास काम देणे सोपे जाईल, असे स्पष्ट केले. मनोहर थोरवे यांनी ग्रामस्थांना न्याय मिळाला पाहिजे, असे सांगितले. विनोद साबळे यांनी आता सर्व काही ठीक होईल. ग्रामस्थ व कंपनी व्यवस्थापनाने एकमेकांना विश्वासात घेऊन काम केल्यास आम्हा कुणालाही मध्यस्थी करण्याची आवश्यकता भासणार नाही, असा विश्वास व्यक्त केला. कैलास म्हामले यांनी आम्ही सनदशीर मार्गाने न्याय मिळविण्याचा प्रयत्न केला. त्याला यश आले. यापुढे आम्ही कंपनीला सहकार्य करू, असा शब्द दिला. अ‍ॅड. निगुडकर आणि अ‍ॅड. मोरे यांनीही चर्चेत भाग घेतला. अ‍ॅड. प्रदीप सुर्वे यांनी उपस्थितांचे आभार मानले.

# सातबाऱ्यावर मत्स्यशेती तलाव अशी नोंद व्हावी

## पेणमधील शेतकऱ्यांची बैठकीत मागणी



(छाया : अनिस मनियार)

**पेण : प्रतिनिधी**

मत्स्य तलावधारक मत्स्यशेतकऱ्यांच्या सातबारावर मत्स्यशेती तलाव किंवा मत्स्य तलाव अशी नोंद व्हावी तसेच मत्स्यशेतकऱ्यांना हेक्टरी चार लाख रुपये नुकसानभरपाई मिळण्यासाठी धोरणात्मक निर्णय होण्याकरता कार्यवाही व्हावी, अशी मागणी पेण तहसील कार्यालयात झालेल्या बैठकीत शेतकऱ्यांनी केली.

सध्या मत्स्यशेतीला मत्स्यशेती पड अशी नोंद होत आहे. ज्या जागेत पीक घेतले जात नाही, त्या जागेतील पिकाची पाहणीत नोंद घेता येत नाही. अशी जागा म्हणजे पड क्षेत्र. सामाजिक कार्यकर्ते राजन झेमसे यांनी नायब तहसीलदार परदेशी यांना हे पटवून दिले. मत्स्यशेती पड ही सद्या होत असलेली नोंद चुकीची आहे व त्यामुळे शेतकऱ्यांचे नुकसान होत आहे.

पड जागेतील पिकाची नोंद होत नाही याचा अर्थ त्या जागेत कोणते पीक होत नाही, न होणाऱ्या पिकासाठी पीक कर्ज अथवा नुकसानभरपाई मिळत नाही. याबाबत वरिष्ठांकडे कागदोपत्री कळवणार असल्याचे या वेळी नायब तहसीलदार नितीन परदेशी यांनी सांगितले.

मत्स्य शेतकऱ्यांना गुंठ्याला चार हजार रुपये इतकी नुकसानभरपाई मिळावी यासाठी धोरणात्मक निर्णय व्हावा याकरिता पेण तहसीलकडून तसा प्रस्ताव सादर करण्याचा निर्णय या बैठकीत झाला.

पेण, पनवेल, पोयनाड विभागात मत्स्यशेती मोठ्या प्रमाणात होते. मत्स्यशेती क्रेडिट कार्ड (किसान क्रेडिट कार्ड-मत्स्यशेती पीक कर्ज तीन लाख) पीककर्जाचा लाभ मत्स्यशेतकऱ्यांना मिळावा यासाठीच्या फॉर्मवर अ‍ॅप्रुअल देण्यासाठी मत्स्य व्यवसाय आधिकाऱ्यांच्या सहीची अवश्यकता असते. ही सही मिळवण्यासाठी मत्स्य व्यवसाय सहाय्यक आयुक्त कायालयात शेतकऱ्यांना फेऱ्या माराव्या लागतात. सर्व शेतकऱ्यांना अलिबाग येथे फेऱ्या मारण्यापेक्षा पीककर्ज फॉर्मवर अ‍ॅप्रुअल देण्यासाठी मत्स्यव्यवसाय अधिकाऱ्यांनी प्रत्येक आठवड्यात एक दिवस पेणमध्ये येऊन मत्स्य शेतकऱ्यांना सेवा द्यावी, अशी मागणी या वेळी करण्यात आली. या मागणीप्रमाणे कार्यवाही व्हावी व मत्स्यविभाग अधिकाऱ्यांनी एक दिवस पेणसाठी द्यावा, असे पत्र पेण तहसीलकडून मत्स्य व्यवसाय सहाय्यक आयुक्तांना देण्याचे या बैठकीत ठरले आहे.

इतर मुद्द्यांवर चर्चा करताना शेतात आंबा, नारळ, काजू वैगेरे झाडांची जशी पीक पाहणीला नोंद केली जाते तशीच मत्स्यशेतीत पीक पाहणीला जिताडा, तिलापिया, आयएमसी मासे, कॅटफिश, कोळंबी, खेकडा अशा मत्स्य संवर्धनाची नोंद सातबाराला व्हावी, अशी मागणी या बैठकीत करण्यात आली.

या बैठकीला नायब तहसीलदार नितीन परदेशी व कर्मचारी, पोलीस प्रशासनाचे अधिकारी, मत्स्य शेतकऱ्यांच्या वतीने वाशी सरपंच गोरक्षनाथ पाटील, मंगेश पाटील, नरेश मोकल, राजेंद्र झेमसे, सी. आर. म्हात्रे, जयसन पाटील, गणपत म्हात्रे, निलेश ठाकूर, आकाश पाटील, शामकांत, नंदकुमार म्हात्रे आदी उपस्थित होते.

# मुरूडमधील 'ते' धोकादायक झाड तोडण्याची मागणी



**मुरूड : प्रतिनिधी**

मुरूड शहरातील लेडीज कुलसुम बेगम हॉस्पिटल येथील मागच्या व रस्तालगत ३५ ते ४० फुट उंचीचे नारळाचे झाड असून ते धोकादायक स्थितीत आहे. त्यामुळे हे झाड तोडावे याकरिता मुरुड पद्मदुर्ग व्यावसायिक कल्याणकारी मंडळाच्या वतीने नगर परिषद मुख्याधिकारी यांना निवेदन देण्यात आले आहे. या निवेदनाची प्रत पोलीस ठाण्यालाही देण्यात आले आहे.

मुरूडमध्ये लेडी कुलसुम बेगम हॉस्पिटल मुख्य बाजारपेठेत असून या रस्त्यावरून अनेक विद्यार्थी, नागरिक व पेशंट ये-जा करीत असतात. येथे रिक्षा स्टँडही असल्याने या ठिकाणी नागरिकांची वर्दळ जास्त असते. या ठिकाणी असलेले नारळाचे हे झाड कधीही पडू शकते आणि यात जिवीतहानी होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामळे नागरिकांच्या जिवाशी न खेळता ताबडतोब हे झाड तोडावे, अशी विनंती पद्मदुर्ग व्यावसायिक कल्याणकारी मंडळाचे अध्यक्ष अरविंद गायकर व सदस्यांनी नगर परिषदेचे प्रशासक तथा मुख्याधिकारी पंकज भुसे यांच्याकडे केली आहे. या निवेदनाची प्रत पोलीस ठाण्यालाही देण्यात आली आहे.

# खालापुरात २२ ग्रामपंचायतीसाठी आरक्षण सोडत; २१ जून ग्रामसभा

**खोपोली : प्रतिनिधी**

जानेवारी २०२३ ते डिसेंबर २०२३ या कालावधीत मुदत पूर्ण होणाऱ्या खालापूर तालुक्यातील २२ ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी प्रभागनिहाय आरक्षण सोडत काढण्याकरिता २१ जून रोजी विशेष ग्रामसभेचे आयोजन करण्यात आले आहे.

राज्य निवडणूक आयोगाच्या आदेशानुसार ग्रामपंचायत सार्वत्रिक निवडणूक कार्यक्रम जाहीर करण्यात आला आहे. यानुसार खालापूर तालुक्यातील तांबाटी, जांभिवली (छत्तीशी) नंदनपाडा, ठाणेन्हावे, होनाड, वावर्ले, वरोसे, बोरगाव (खुर्द) जांबरूग, माणकिवली, वासांबे, चांभार्ली, माजगाव, इसांबे, सावरोली, कुंभिवली, आत्करगाव, खानाव, चिलठण, नारंगी, शिरवली (छत्तीशी) बीड खुर्द या ग्रामपंचायतींसाठी प्रभागनिहाय आरक्षण सोडत काढण्यात येणार आहे. ग्रामपंचायत कार्यालयात ग्रामसभेचे आयोजन २१ जून रोजी करण्यात आले आहे.

ग्रामसभेबाबत फलक, दवंडी याद्वारे सूचना प्रसिद्धी करण्याचे सूचित करण्यात आले आहे. आरक्षणाबाबत हरकती व सूचना २७ जून ते ३ जुलैपर्यंत तहसील कार्यालयात लेखी स्वरूपात सादर करता येणार आहेत.

# 'फेरामेंटा फार्मा'कडून पोलीस दलास चार दुचाकी भेट

**खोपोली, खालापूर : प्रतिनिधी**

खालापूर तालुक्याची भौगोलिक परिस्थिती पाहता पोलीस दलासाठी दुचाकी हे साधन अतिशय उपयुक्त ठरणार असून फेरामेंटा कंपनी व्यवस्थापनाकडून सामाजिक बांधिलकीतून दिलेल्या दुचाकीचा योग्य वापर पोलीस दलाकडून होईलम असे आश्वासन पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांनी खालापूर येथील कार्यक्रमात दिले .

औषध उत्पादनात अग्रेसर असलेली फेरामेंटा कंपनीचे कार्यकारी संचालक सतीश वर्मा यांनी रायगड पोलीस दलाला चार दुचाकी सामाजिक फंडातून दिल्या आहेत. रायगड पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे, उपविभागीय पोलीस अधिकारी विक्रम कदम, खालापूर पोलीस निरीक्षक बाळा कुंभार, खोपोली पोलीस निरीक्षक शिरीष पवार, सहाय्यक पोलीस निरीक्षक युवराज सूर्यवंशी, महिला पोलीस उपनिरीक्षक सरला काळे, पोलीस उपनिरीक्षक शिवाजी सुंदरे, प्रदीप बोराटे, पोलीस पाटील संघटना खालापूर तालुका अध्यक्ष अनंत ठोंबरे, पोलीस पाटील व अन्य मान्यवरांच्या उपस्थितीत पोलीस दलाला दुचाकी अर्पण सोहळा पार पडला.





या वेळी खालापूर पोलीस निरीक्षक बाळा कुंभार यांनी 'फेरामेंटा'चे कार्यकारी संचालक सतीश वर्मा यांचे कौतुक करताना तीन पिढ्यांपासून वर्मा कुटुंब सामाजिक कार्यात अग्रेसर असल्याचे सांगितले.

# खोपोलीत महिलेस शिवीगाळ, धक्काबुक्कीप्रकरणी गुन्हा दाखल

**खोपोली : प्रतिनिधी**

कृष्णा नगर येथील कार्यकर्ते मोहसीन शेख यांच्यावर महिलेस जातीवाचक शिवीगाळ व धक्काबुक्की केल्याप्रकरणी खोपोली पोलीस ठाण्यात अनुसूचित जाती जमाती अधिनियमांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार शिळफाटा आभानी रोड या ठिकाणी सोळंकी कुटुंब चाळीस वर्षांपासून राहत आहे. मोहसीन शेख यांचे त्या ठिकाणी असलेल्या जागेला लागूनच सार्वजनिक शौचालय आहे व त्यांच्यासमोर मोहसीन शेख यांनी मोठा खड्डा खणला. यावरून सोळंकी कुटुंब व मोहसीन शेख यांच्या शाब्दिक वाद झाला व तो वाद विकोपाला गेला. दरम्यान सोळंके कुटुंबातील महिलेने शेख यांनी जातीवाचक शिवीगाळ व धक्काबुक्की केल्याचा आरोप केला आहे.

या प्रकरणाच्या चौकशीसाठी संबंधितांना पोलीस ठाण्यात बोलाविले असता शेखने या वेळी मुनाफ नावाच्या तरुणास मारहाण केल्याचीही तक्रार पोलिसात देण्यात आल्यानंतर पोलिसांनी शेखविरोधात आणखी एक गुन्हा दाखल केला. या प्रकरणी अधिक तपास सुरू आहे.

# दोन वर्षांनी मिठागर गावातून एसटी धावली



**मुरूड : प्रतिनिधी**

मुरूड तालुक्यातील मिठागर गावात दोन वर्षांनंतर एसटी बस आल्याने ग्रामस्थांनी जंगी स्वागत केले व आनंद साजरा केला.

माजी सरपंच मंदा ठाकूर यांनी एसटीची पूजा करून पुष्पहार अर्पण केला आणि श्रीफळ वाढविले. या वेळी आगार व्यवस्थापक नीता जगताप, मुरूड तालुका प्रवासी संघटनेचे अध्यक्ष श्रीकांत (बाबू) सुर्वे, गौतम भोसले आणि ग्रामस्थ उपस्थित होते.

या वेळी माजी सरपंच मंदा ठाकूर म्हणाल्या की, मिठेखारमधून एसटी पुन्हा सुरू व्हावी यासाठी अनेक निवेदन देण्यात आली होती. या संदर्भातील माहिती आमदार महेंद्र दळवी व प्रवासी संघटना अध्यक्ष श्रीकांत सुर्वे यांना दिली होती. याची दखल आमदार दळवी यांनी घेऊन मुरूड आगार व्यवस्थापक नीता जगताप यांच्याशी चर्चा करून सकारात्मक निर्णय गावासाठी घेतला. त्यानुसार शुक्रवारपासून रोह्याला जाणाऱ्या-येणाऱ्या सर्व एसटी बसेस मिठागर गावातून जात आहेत.

प्रवासी संघटनेचे अध्यक्ष श्रीकांत सुर्वे म्हणाले की, कार्यसम्राट आमदार महेंद्र दळवी यांच्या प्रयत्नातून मिठागर गावात एसटी धावली आहे. यासाठी माजी सरपंच मंदा ठाकूर यांनी प्रयत्न केले आहेत. त्यांचेही आभार मानले पाहिजेत.

# देगाव शाळेत मेळावा उत्साहात

**माणगाव : प्रतिनिधी**

माणगाव तालुक्यातील रायगड जिल्हा परिषदेच्या देगाव येथील शाळेत नुकताच शाळापूर्व तयारी मेळावा शैक्षणिक वर्ष २०२३-२४ अनुषंगाने उत्साहात झाला. या वेळी नवागतांचे स्वागत, मोफत पुस्तके व गणवेश वाटप कार्यक्रमही झाला.

या वेळी शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष संजय गायकवाड, मुख्याध्यापिका ऊर्मिला मोरे, शिक्षक शंकर शिंदे, उपशिक्षिका प्रतिक्षा आंबुर्ले, स्वयंपाकी समिक्षा दिवेकर, प्रणाली गायकवाड,मेघना गायकवाड, ललिता पवार, रोहिणी सकपाळ, अंजनी कदम, वैष्णवी मर्चंडे, अपर्णा झांजे, दीपक मर्चंडे, माजी पोलीस सुरेश गायकवाड आदींसह पालकवर्ग व देगाव ग्रामस्थ उपस्थित होते.

उन्हाळी सुट्या संपून शाळा सुरू झाल्या आहेत. विद्यार्थ्यांचे नव्या शैक्षणिक वर्षात स्वागत करण्यात आले.

# माथेरानच्या पर्यावरणाला प्लास्टिकजन्य कचऱ्याचे ग्रहण

**माथेरान : प्रतिनिधी**

राज्यातील स्वस्त आणि मुंबई, पुण्यापासून अगदी पर्यटनस्थळ म्हणून माथेरानला सुट्टयांच्या हंगामात त्याचप्रमाणे ऋतूनुसार पर्यटकांची मोठया प्रमाणावर गर्दी होते.व र्षाकाठी जवळपास दहा ते बारा लाखांपेक्षा अधिक पर्यटक याठिकाणी येत असतात, मात्र त्यांच्याजवळ असणाऱ्या प्लास्टिक पाण्याच्या बाटल्या त्याचप्रमाणे कुरकुरे, वेफर्स तसेच अन्य प्लास्टिक कचरा ठराविक पॉईंट्सच्या भागात कचराकुंडी नसल्याने जंगलात टाकला जातो.



प्लास्टिक कचऱ्याचे दुष्परिणाम येथील अनेक वर्षांपासून उभ्या असलेल्या वृक्षवल्लीला सोसावा लागत असून प्लास्टिकमुळे झाडांचे आयुष्य संपुष्टात येत असून जंगलातील झाडी लोप पावत चालली आहे. यामुळे इथल्या पर्यावरणाचा ऱ्हास होऊन पर्यावरणाचे संतुलन बिघडत चालले आहे. हवेतील गारवा हळूहळू नाहीसा होत असल्याने या स्थळीसुध्दा काही वर्षांपासून उष्मा जाणवत आहे. त्यामुळे साहजिकच इथल्या पर्यटनावर याचा विपरीत परिणाम होताना दिसून येत आहे. व्यवसायानिमित्ताने आलेले परिसरातील लोंढे इथे आर्थिक स्रोत अधिक असल्याने स्थायिक झाले आहेत. झोपडपट्टीच्या डोंगरालगतच्या भागातसुध्दा घरांची बांधकामे झाल्याने झाडी नष्ट झाली आहे. परिणामी या ठिकाणी कचऱ्याचे साम्राज्य सर्वाधिक पसरत असून प्रशासनाने ठोस पावले उचलणे गरजेचे बनले आहे.

नगर परिषदेच्या माध्यमातून घनकचरा व्यवस्थापन ठेक्यासाठी लाखो रुपये खर्च केला जात असताना जंगलात एवढ्या मोठ्या प्रमाणावर सुका कचरा आढळून येत आहे. माथेरानच्या जंगलाला प्लास्टिक कचऱ्याने व्यापलेले आहे. संबंधितांकडून नियोजित पध्दतीने कामे पूर्ण केली जात आहेत की नाही याकडे नगरपालिका प्रशासनाने लक्ष केंद्रित करणे आवश्यक आहे. त्यातच नगर परिषदेत मुख्याधिकारी नसल्याने जनतेच्या समस्या त्याचप्रमाणे अत्यावश्यक कामे पूर्ण होण्यासाठी वेळ लागत आहे.

काही महिन्यांपूर्वी येथील स्वच्छतादूत असणारे सामाजिक कार्यकर्ते राकेश कोकळे यांनी हजारो प्लास्टिक बाटल्या गोळा करून नगर परिषदेच्या ताब्यात दिल्या होत्या. दरवेळी श्रमदान करावे लागणार असेल, तर घनकचरा व्यवस्थापन समिती फक्त बिले घेण्यासाठी आहे काय, असा प्रश्न उपस्थित केला जात आहे.

## वनडे वर्ल्डकप पात्रतेसाठी १० संघांमध्ये चुरस

# आजपासून क्वालिफायर लढती

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

एकदिवसीय विश्वचषक स्पर्धेची चाहते आतुरतेने वाट पाहत आहेत. क्रिकेटचा हा महाकुंभ सुरू होण्यास फार दिवस उरले नाहीत. या पार्श्वभूमीवर स्पर्धेच्या पात्रतेसाठी रविवार (दि. १८)पासून सामन्यांना सुरुवात होणार आहे.

भारताव्यतिरिक्त इंग्लंड, ऑस्ट्रेलिया, न्यूझीलंड, अफगाणिस्तान, पाकिस्तान, बांगलादेश आणि दक्षिण आफ्रिका हे संघ यंदाच्या एकदिवसीय विश्वचषकासाठी थेट पात्र ठरले आहेत. आता उर्वरित दोन जागांसाठी १० संघ दावेदार आहेत. या संघांमध्ये १८ जून ते ९ जुलै या कालावधीत पात्रता फेरी खेळवली जाणार आहे. त्यांच्यात एकूण ३४ सामने खेळले जाणार आहेत.



वास्तविक, आठ संघ एकदिवसीय विश्वचषकाच्या मुख्य स्पर्धेसाठी थेट पात्र ठरले होते. आता उर्वरित दोन स्थानांसाठी १० संघ पात्रता फेरीत भाग घेतील. यामध्ये वेस्ट इंडिज, श्रीलंका, झिम्बाब्वे, नेदरलँड, आयर्लंड, स्कॉटलंड, ओमान, नेपाळ, अमेरिका आणि यूएई या संघांचा समावेश आहे. या संघांची दोन गटांत विभागणी करण्यात आली आहे. वेस्ट इंडिज, झिम्बाब्वे, नेदरलँड्स, नेपाळ आणि अमेरिका यांना 'अ' गटात ठेवण्यात आले आहे, तर श्रीलंका, आयर्लंड, स्कॉटलंड, ओमान आणि यूएई यांना ब गटात ठेवण्यात आले आहे.

सर्वप्रथम दोन्ही गटांचे संघ आपापल्या गटात उपस्थित असलेल्या उर्वरित संघांविरुद्ध प्रत्येकी एक सामना खेळतील. २७ जूनपर्यंत ग्रुप स्टेजमध्ये एकूण २० सामने होतील. यानंतर दोन्ही गटातील टॉप तीन संघ मिळून सुपर-६मध्ये स्थान मिळवतील. सुपर-६चे सामने २९ जूनपासून सुरू होणार आहेत. या टप्प्यात सर्व संघ त्या संघांविरुद्ध सामने खेळतील ज्यांच्याविरुद्ध ते गट टप्प्यात खेळले नाहीत. येथूनच संघ अंतिम फेरीसाठी लढतील. अंतिम फेरीत पोहचणारे दोन्ही संघ विश्वचषकासाठी पात्र ठरतील. या संघांना विश्वचषकात नववे आणि दहावे स्थान मिळेल.

## बांगलादेशची अफगाणिस्तानवर तब्बल ५४६ धावांनी मात

**ढाका : वृत्तसंस्था**

ढाका येथे झालेल्या कसोटी सामन्यात बांगलादेशने अफगाणिस्तानचा ५४६ धावांनी पराभव केला. यासोबतच बांगलादेशने अफगाणिस्तानविरुद्धच्या एकमेव कसोटीत २१व्या शतकातील सर्वांत मोठा विजय नोंदवला.

बांगलादेश आणि अफगाणिस्तान संघांत ढाका येथील शेर-ए-बांगला नॅशनल स्टेडियमवर सामना रंगला. या सामन्यात बांगलादेशने अफगाणिस्तानचा ५४६ धावांनी पराभव केला. बांगलादेशने आपल्या पहिल्या डावात ३८२ धावा केल्या होत्या. प्रत्युत्तरात अफगाणिस्तानचा संघ १४६ धावांवर गारद झाला. यानंतर बांगलादेशने दुसऱ्या डावात चार विकेट्सच्या मोबदल्यात ४२५ धावा करीत अफगाणिस्तानला केवळ ११५ धावांत गुंडाळले. अशाप्रकारे बांगलादेशने ५४६ धावांनी मोठा विजय नोंदवला. कसोटी क्रिकेटच्या इतिहासातील हा तिसरा सर्वांत मोठा विजय आहे.

या विक्रमी यादीत इंग्लंड पहिल्या, तर ऑस्ट्रेलिया दुसऱ्या क्रमांकावर आहे. १९२८मध्ये इंग्लंडने ६७५ धावांनी विजय मिळवला होता. त्याचवेळी ऑस्ट्रेलियाने १९३४मध्ये कसोटी सामना ५६२ धावांनी जिंकला होता.

## उरणच्या सिद्धार्थ म्हात्रेची 'एमपीएल'मध्ये निवड

**उरण : बातमीदार**

महाराष्ट्र प्रीमिअर लीग या महाराष्ट्रातील सर्वांत मोठ्या टी-२० क्रिकेट स्पर्धेसाठी उरणमधील सिद्धार्थ म्हात्रे याची निवड झाली आहे. सिद्धार्थ हा कोल्हापूर टस्कर्स संघाकडून खेळत आहे. हास्य प्रबोधनकार संजीवन म्हात्रे यांचा तो मुलगा आहे.



पुणेरी बाप्पा, रत्नागिरी जेटस, सोलापूर रॉयल्स, छत्रपती संभाजी किंग्ज, एगल टायटन्स आणि कोल्हापूर टस्कर्स अशा संघांमध्ये एमपीएल रंगत आहे. सिद्धार्थ हा केदार जाधव यांच्या नेतृत्वाखाली कोल्हापूरच्या टीममध्ये खेळत आहे.

या स्पर्धेत केदार जाधव, ऋतुराज गायकवाड, तुषार देशपांडे, राहुल त्रिपाठी असे आयपीएलमधील अनेक खेळाडू विविध संघांतून खेळत आहेत. त्यामुळे या स्पर्धेद्वारे नवोदित खेळाडूंना चांगला प्लॅटफॉर्म मिळणार आहे. या निवडीबद्दल सिद्धार्थचे अभिनंदन होत असून अनेकांनी त्याला शुभेच्छा दिल्या.

## कराटे स्पर्धेत 'सीकेटी'च्या विद्यार्थ्यांची आंतरराष्ट्रीय भरारी



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

नेपाळमधील काठमांडू येथे नुकत्याच झालेल्या पहिल्या साऊथ एशियन मर्दानी स्पोर्ट्स चॅम्पियनशिप आणि कराटे चॅम्पियनशिप स्पर्धेत जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या नवीन पनवेल येथील चांगू काना ठाकूर (सीकेटी) इंग्रजी माध्यमिक विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी सुयश प्राप्त केले आहे.

आंतरराष्ट्रीय स्तरावरील कराटे स्पर्धेत पार्थ प्रमोद निकम याने ५६ किलो वजनी गटात दोन सुवर्णपदके आणि स्वतिक सतिश भोसले याने ४९ किलो वजनी गटात दोन रौप्यपदके पटकाविली. या दोघांनाही त्यांचे प्रशिक्षक निलेश भोसले यांचे मार्गदर्शन लाभले.

यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर, संस्थेचे अध्यक्ष अरुणशेठ भगत, व्हाईस चेअरमन वाय. टी. देशमुख, सचिव डॉ. एस. टी गडदे, संस्थेचे सर्व पदाधिकारी, मुख्याध्यापक संतोष चव्हाण, पर्यवेक्षक, मार्गदर्शक शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी यांनी अभिनंदन केले.

## मुदित दानीला अमेरिकन पुरस्कार

**मुंबई : प्रतिनिधी**

युवा टेबल टेनिसपटू मुदित दानी याने भारतासाठी अभिमानास्पद कामगिरी करताना अमेरिकेतील नॅशनल कॉलेजिएट टेबल टेनिस असोसिएशनच्या (एनसीटीटीए) वतीने देण्यात येणारा वर्षातील सर्वोत्तम पुरुष खेळाडूचा पुरस्कार पटकाविला. विशेष म्हणजे हा पुरस्कार पटकावणारा मुदित पहिला भारतीय ठरला आहे.

अमेरिका टेबल टेनिस संघटनेशी संलग्न असलेल्या एनसीटीटीच्या वतीने प्रत्येक मोसमाच्या अखेरीस अमेरिका आणि कॅनेडाच्या विद्यापीठांमध्ये सर्वोत्तम कामगिरी करणाऱ्या पुरुष खेळाडूंना या पुरस्काराने सन्मानित करण्यात येते.



## श्री स्वामी नारायण गुरूकुलमध्ये क्रीडा स्पर्धा उत्साहात


**मोहोपाडा : प्रतिनिधी**

चौक येथील श्री स्वामी नारायण गुरुकुल आंतरराष्ट्रीय शाळेत विविध खेळांचा समावेश असलेल्या क्रीडा स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेस प्रतिसाद लाभला.

या वेळी गुरूकुलचे मुख्याध्यापक डॉ. पी.हरिबाबू यांनी सांगितले की, खेळ हे आपल्यासाठी खूप फायदेशीर आहेत, कारण हे वेळेचे बंधन, धैर्य, शिस्त, गटाने काम करणे हे खेळ शिकवतात. आत्मविश्वासाची पातळी वाढविण्यास आणि त्यामध्ये सुधारणा करण्यात खेळ मदत करतात. शिवाय नियमित खेळ खेळल्याने आपण अधिक सक्रिय आणि निरोगी राहू शकतो.

क्रीडा स्पर्धा यशस्वी करण्यासाठी संस्थेचे संचालक विश्वहिंदू स्वामी, ब्रम्हस्वरूप स्वामी, मुख्याध्यापक डॉ. पी. हरीबाबू, क्रीडा शिक्षक व सर्व शिक्षकवर्ग यांनी मेहनत घेतली.

## पॉवरलिफ्टिंग अजिंक्यपद व निवड चाचणी स्पर्धा



**पनवेल : रामप्रहर वृत्त**


महाराष्ट्र राज्य पॉवरलिफ्टिंग असोसिएशनच्या वतीने २२ ते २४ जून या कालावधीत अजिंक्यपद व निवड चाचणी स्पर्धा मुंबईत होणार आहे. पुरुष आणि महिला गटात होणाऱ्या या स्पर्धेत अनेक जिल्ह्यांचे नामवंत खेळाडू सहभागी होणार आहेत.

क्रीडाप्रेमी आणि आंतरराष्ट्रीय पदक विजेते आमदार कॅप्टन तमिल सेलव्हन यांनी ही स्पर्धा पुरस्कृत केली आहे. त्यांना पॉवरलिफ्टिंग खेळाची आवड आहे. स्पर्धा सायन कोळीवाडा येथील समाज मंदिर हॉलमध्ये आयोजित करण्यात आली आहे, असे महाराष्ट्र राज्य पॉवरलिफ्टिंग असोसिएशनचे सरचिटणीस व शिवछत्रपती पुरस्कार प्राप्त संजय सरदेसाई यांनी पत्रकाद्वारे कळविले आहे.

या स्पर्धेचे नियोजन संजय सरदेसाई यांच्याकडे असून त्यांना महाराष्ट्र राज्य संघटनेचे सहसचिव, शिवछत्रपती पुरस्कारप्राप्त संजय माधव आणि खजिनदार, शिवछत्रपती पुरस्कारप्राप्त सूर्यकांत गद्रे यांचे सहकार्य लाभत आहे. या निवड चाचणीतून राष्ट्रीय स्पर्धेसाठी महाराष्ट्र संघ निवड करण्यात येईल व तो संघ १२ ते १६ ऑगस्टदरम्यान उत्तराखंडमधील काशीपूर येथे ठिकाणी होणाऱ्या वरिष्ठ राष्ट्रीय स्पर्धेत सहभागी होणार आहे.

## सहा चेंडूंत सहा विकेट्स

### युवा गोलंदाजाचे जादुई षटक



**लंडन : वृत्तसंस्था**

क्रिकेट हा अनिश्चिततेचा खेळ म्हटला जातो. या खेळात रोज नवनवीन रेकॉर्ड बनतात आणि मोडतात. कधी फलंदाज, कधी गोलंदाज, तर कधी क्षेत्ररक्षक क्रिकेटच्या मैदानावर पराक्रम गाजवत असतात. अलीकडेच अशाच एका युवा गोलंदाजाने सहा चेंडूंत सहा विकेट्स घेत दुर्मीळ कामगिरी केली

क्रिकेटचा कोणताही फॉरमॅट असो प्रत्येक गोलंदाजाला हॅट्ट्रिक करायची असते. १२ वर्षांच्या मुलाने एकदा नव्हे; तर सलग दोनदा अशी कामगिरी केली. ऑलिव्हर व्हाईट हाऊस नावाच्या या खेळाडूने आपल्या क्लबसाठी आश्चर्यकारक ओव्हर टाककले. त्याने या षटकात दुहेरी हॅट्ट्रिक पूर्ण केली, म्हणजे प्रत्येक चेंडूवर विकेट घेतली.

ऑलिव्हर व्हाइट हाऊसने कुकहिलविरुद्ध ब्रॉम्सग्रोव्ह क्रिकेट क्लबकडून खेळताना हा पराक्रम केला. ऑलिव्हरने सहा चेंडूंत प्रतिस्पर्धी संघाच्या सहा फलंदाजांना पॅव्हेलियनमध्ये पाठवले. ऑलिव्हरने दोन षटकांत एकही धाव न देता तब्बल आठ विकेट्स घेतल्या.














दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **-मुख्य संपादक**


हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले.** पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com